भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम, १९८४

**(१९८४ चा अधिनियम क्रमांक ५२)**

[ ६ नोव्हेंबर २००३ रोजी यथाविद्यमान ]

# The Indian Veterinary Council Act, 1984

**(Act No. 52 of 1984)**

[ *As in force on the 6th November 2003* ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००४

**[किंमत : रुपये ८.००]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ नोव्हेंबर २००३ रोजी यथाविद्यमान असलेला दि इंडियन व्हेटरनरी कौन्सिल अॅक्ट, १९८४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक १, दिनांक २६ ऑगस्ट, २००४ यात पृष्ठ २७ ते ४७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ६ नोव्हेंबर २००३

**डी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Indian Veterinary Council Act, 1984 as on the 6th November, 2003 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 13, dated 26th August, 2004 on pages 27 to 47.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 6th November 2003.

D. K. VISHWANATHAN,
Secretary to the Government of India.

# भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम, १९४८

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण एक

#### प्रारंभिक


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.


### प्रकरण दोन

#### भारतीय पशुवैद्यक परिषद


३. परिषदेची स्थापना व रचना.

४. सदस्यांच्या निवडणुकीची पद्धत.

५. अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य यांचा पदावधी.

६. सदस्यत्व संपुष्टात येणे.

७. नैमित्तिक रिक्त पदे.

८. राजीनामा.

९. परिषदेच्या बैठका.

१०. परिषदेवरील पद रिक्त राहिल्यामुळे कृती, इत्यादी अवैध न ठरणे.

११. सचिव व इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांची नियुक्ती.

१२. कार्यकारी समिती व इतर समित्या.

१३. शुल्क व भत्ते.

१४. परिषदेने द्यावयाची माहिती व तिचे प्रकाशन.

१५. भारतातील पशुवैद्यक संस्थांद्वारे देण्यात आलेल्या पशुवैद्यक अर्हतांना मान्यता देणे.

१६. ज्या देशांबरोबर अन्योन्यतेची योजना अस्तित्वात आहे तेथील पशुवैद्यक संस्थांद्वारे देण्यात आलेल्या पशुवैद्यक अर्हतांना मान्यता देणे.

१७. अन्योन्यतेची कोणतीही योजना अस्तित्वात नसेल अशा देशांतील पशुवैद्यक संस्थानी दिलेल्या पशुवैद्यक अर्हतांच्या विवक्षित प्रकरणातील मान्यतेसाठी विशेष तरतूद.

१८. अभ्यासक्रम व परीक्षा यांविषयीची माहिती देण्यास फर्मावण्याचा अधिकार.

१९. पशुवैद्यक संस्था आणि परीक्षा यांचे निरीक्षण.

२०. वीक्षकांची नियुक्ती.

२१. मान्यता काढून घेणे.

२२. पशुवैद्यक शिक्षणाचा किमान दर्जा.


### प्रकरण तीन

#### भारतीय पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही


२३. भारतीय पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही.

२४. भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीतील नोंदणी.

२५. नोंदणी प्रमाणपत्र देणे.

२६. जादा अर्हतांची नोंदणी.

२७. भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीतून नावे काढणे.

२८. भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीत नोंदलेल्या व्यक्तीने निवासस्थान किंवा व्यवसायाचे स्थान यातील बदल कळवणे.


### प्रकरण चार

#### नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायींचे विशेषाधिकार


२९. भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीमध्ये नोंदलेल्या व्यक्तीचे विशेषाधिकार.

३०. भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीमध्ये नावे नोंदण्यात आलेल्या व्यक्तींचे अधिकार.

प्रकरण पाच

शिस्त

३१. व्यावसायिक वर्तणूक.

प्रकरण सहा

राज्य पशुवैद्यक परिषदा

३२. राज्य पशुवैद्यक परिषदांची स्थापना व रचना.
३३. आंतरराज्यीय करार.
३४. संयुक्त राज्य पशुवैद्यक परिषदांची रचना.
३५. राज्य पशुवैद्यक परिषदांचे विधिद्वारा संस्थापन.
३६. अध्यक्ष.
३७. निवडणुकांची पद्धत.
३८. पदावधी आणि नैमित्तिक रिक्त पदे.
३९. राजीनामा.
४०. कार्यकारी व इतर समित्या.
४१. शुल्क व भत्ते.
४२. प्रबंधक आणि इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांची नियुक्ती.
४३. राज्य पशुवैद्यक परिषदेने पुरवावयाची माहिती.

प्रकरण सात

नोंदणी

४४. राज्य पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही तयार करणे आणि ठेवणे.
४५. नोंदवही प्रथम तयार करणे.
४६. नोंदवही तयार झाल्यानंतर नोंदीसाठी अर्हता.
४७. नोंदणीसाठी आलेल्या अर्जांची छाननी.
४८. नवीकरण फी.
४९. नोंदवहीतून नाव काढून टाकणे.
५०. राज्य पशुवैद्यक नोंदवही पूर्ववत करणे.
५१. राज्य पशुवैद्यक नोंदवहीचे मुद्रण.

प्रकरण आठ

संकीर्ण

५२. नोंदणीचे स्थानांतरण.
५३. अधिकारितेस प्रतिबंध.
५४. प्रमाणपत्रांची दुसरी प्रत देणे.
५५. नावनोंदणी झाल्याचे खोटेच सांगितल्यास होणारी शास्ती.
५६. नामाभिधानाचा गैरवापर.
५७. नोंदणी न झालेल्या व्यक्तींनी व्यवसाय करणे.
५८. नोंदणी प्रमाणपत्र स्वाधीन करण्यात कसूर करणे.
५९. अपराधाची दखल घेणे.
६०. दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करण्यास रोध.
६१. फीचा भाग परिषदेला प्रदान करणे.
६२. लेखे व लेखापरीक्षा.
६३. चौकशी आयोगाची नेमणूक.
६४. नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.
६५. नियम करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.
६६. विनियम करण्याचा अधिकार.
६७. निरसन व व्यावृत्ती.

पहिली अनुसूची

दुसरी अनुसूची

# भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम, १९८४

(१९८४ चा अधिनियम ५२)

(६ नोव्हेंबर, २००३ रोजी यथाविद्यमान)

[१८ ऑगस्ट, १९८४]

**पशुवैद्यक व्यवसायाचे नियमन करण्यासाठी आणि त्या प्रयोजनार्थ भारतीय पशुवैद्यक परिषदेची, तसेच राज्य पशुवैद्यक परिषदांची स्थापना करणे, पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवह्या ठेवणे आणि त्याच्याशी संबंधित बाबी यांचे विनियमन करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** पशुवैद्यक व्यवसायाचे नियमन करण्यासाठी तरतूद करणे, तसेच त्या प्रयोजनार्थ भारतीय पशुवैद्यक परिषदेची आणि राज्य पशुवैद्यक परिषदांची स्थापना करणे आणि संपूर्ण भारतासाठी पशुवैद्यक व्यवसाय करण्याची पात्रता असणाऱ्या व्यक्तींच्या नोंदवह्या ठेवणे व त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबी यांची तरतूद करणे समयोचित आहे;

**आणि ज्याअर्थी,** संविधानाच्या अनुच्छेद २४९ आणि २५० मध्ये करण्यात आलेली तरतूद खेरीज करून, संसदेला राज्यांसाठी पूर्वोक्त बाबींसंबंधात कायदा करण्याचा कोणताही अधिकार नाही;

**आणि ज्याअर्थी,** संविधानाच्या अनुच्छेद २५२, खंड (१) यास अनुलक्षून, हरियाणा, बिहार, ओरिसा, हिमाचल प्रदेश आणि राजस्थान या राज्यांच्या सर्व विधानमंडळांनी असे ठराव पारित केले आहेत की, पूर्वोक्त बाबींचे नियमन त्या राज्यांमध्ये संसदेकडून कायद्याद्वारे करण्यात यावे;

**त्याअर्थी,** याद्वारे भारतीय गणराज्याच्या पस्तिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, "भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम, १९८४" असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार प्रथमत: हरियाणा, बिहार, ओरिसा, हिमाचल प्रदेश आणि राजस्थान ही संपूर्ण राज्ये आणि सर्व संघ राज्यक्षेत्रे यात होईल आणि संविधानाच्या अनुच्छेद २५२, खंड (१) यास अनुलक्षून त्या संदर्भात ठरावाद्वारे हा अधिनियम जी राज्ये स्वीकारतील अशा इतर सर्व राज्यांमध्ये देखील त्याचा विस्तार होईल.

(३) ज्या राज्यात किंवा संघ राज्यक्षेत्रात त्याचा विस्तार आहे किंवा भविष्यात होईल, त्या ठिकाणी तो केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास* अंमलात येईल. या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नेमून देण्यात येतील किंवा वेगवेगळी राज्ये अथवा संघ राज्यक्षेत्रे यांच्यासाठी वेगवेगळे दिनांक नेमून देता येतील.

**व्याख्या.**

२. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "परिषद" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेली भारतीय पशुवैद्यक परिषद, असा आहे;

(ख) "सदस्य" याचा अर्थ, परिषदेचा सदस्य, असा आहे ;

(ग) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनी विहित केलेले, असा आहे ;

(घ) "अध्यक्ष" याचा अर्थ, परिषदेचा अध्यक्ष, असा आहे;

(ङ) "मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता" याचा अर्थ, अनुसूची एक किंवा अनुसूची दोन मध्ये समाविष्ट केलेल्या पशुवैद्यक अर्हतांपैकी कोणतीही अर्हता, असा आहे;

---

*मध्यप्रदेश व केरळ या राज्यांमध्ये १ डिसेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून अंमलात येईल पहा. स्थायी आदेश क्र. ४२६(ई), दिनांक २६ नोव्हेंबर, १९८६;

मणिपूर मध्ये १५ फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून अंमलात येईल. पहा. स्थायी आदेश क्र. २८३ (ई), दिनांक १५ फेब्रुवारी, १९८७;

केंद्र सरकारमध्ये २० जुलै, १९९५ रोजी व तेव्हापासून अंमलात येईल. पहा. स्थायी आदेश क्रमांक ६८३(ई), दिनांक २० जुलै, १९९५.

(च) "नोंदवही" याचा अर्थ, या अधिनियमानुसार ठेवलेली नोंदवही, असा आहे;

(छ) "नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, नोंदवहीमध्ये त्यावेळी रीतसर नाव नोंदण्यात आलेली व्यक्ती, असा आहे;

(ज) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेला विनियम, असा आहे;

(झ) "राज्य पशुवैद्यक परिषद" याचा अर्थ, कलम ३२ अन्वये स्थापन करण्यात आलेली पशुवैद्यक परिषद, असा आहे आणि त्यात, कलम ३३ अन्वये केलेल्या करारानुसार स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त राज्य पशुवैद्यक परिषदेचा समावेश आहे;

(ञ) "पशुवैद्यक संस्था" याचा अर्थ, पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन यांमधील पदव्या, पदविका किंवा लायसने देणारे भारतातील किंवा भारताबाहेरील कोणतेही विद्यापीठ किंवा अन्य संस्था, असा आहे;

(ट) "पशुवैद्यक औषध" याचा अर्थ, आधुनिक वैज्ञानिक पशुवैद्यक औषधाच्या सर्व शाखांमधील औषधी, असा आहे आणि त्यामध्ये पशुवैद्यकीय शल्यचिकित्साशास्त्र व प्रसूतिशास्त्र यांचा समावेश आहे ;

(ठ) "उपाध्यक्ष" याचा अर्थ, परिषदेचा उपाध्यक्ष, असा आहे.

## प्रकरण दोन

### भारतीय पशुवैद्यक परिषद

परिषदेची स्थापना व रचना. ३. (१) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या बाबतीत नेमून देईल अशा तारखेपासून भारतीय पशुवैद्यक परिषद म्हणून ओळखली जाणारी एक परिषद स्थापन करील.

(२) ही परिषद म्हणजे पूर्वोक्तप्रमाणे नाव असणारा एक निगम निकाय असेल. त्याची अखंड परंपरा असेल आणि एक सामाईक मोहोर असेल. त्याला स्थावर आणि जंगम अशा दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा, तसेच करार करण्याचा अधिकार असेल. तो त्या नावाने दावा दाखल करू शकेल, किंवा त्याच्यावर त्या नावाने दावा दाखल करता येईल.

(३) ही परिषद पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(क) हा अधिनियम ज्या राज्यांना लागू होतो त्या राज्यांच्या पशुसंवर्धन संचालकांमधून (ते कोणत्याही नावाने ओळखले जात असोत) केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाचे पाच सदस्य ;

(ख) हा अधिनियम ज्या राज्यांना लागू होतो अशा राज्यांमधील पशुवैद्यक संस्थांच्या प्रमुखांमधून केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाचे चार सदस्य;

(ग) भारतीय कृषि संशोधन परिषदने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य ;

(घ) पशुसंवर्धन आयुक्त, भारत सरकार, पदसिद्ध ;

(ङ) केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन मंत्रालयाचे प्रतिनिधित्व करणारा केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य;

(च) भारतीय पशुवैद्यक संघटनेने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य ;

(छ) भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीमध्ये नावे नोंदलेल्या व्यक्तींनी त्यांच्यातून निवडावयाचे अकरा सदस्य ;

(ज) या अधिनियमाचा विस्तार ज्या राज्यांमध्ये आहे त्या राज्यांच्या राज्य पशुवैद्यक परिषदांच्या अध्यक्षांमधून केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य ;

(झ) या अधिनियमाचा विस्तार ज्या राज्यांमध्ये असेल त्या राज्यांच्या राज्य पशुवैद्यक अधिसंघाच्या अध्यक्षांमधून केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य ;

(ञ) सचिव, भारतीय पशुवैद्यक परिषद, पदसिद्ध.

(४) अध्यक्ष आणि उपाध्यक्ष हे सदस्यांकडून विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशा रीतीने त्यांच्यामधून निवडून दिले जातील.

(५) अध्यक्षाचे पद जेव्हा रिक्त असेल तेव्हा उपाध्यक्ष हा अध्यक्षाची कामे पार पाडील.

(६) केंद्र सरकार, सदस्य म्हणून नामनिर्देशित केलेल्या किंवा निवडलेल्या व्यक्तींची नावे शासकीय राजपत्रात अधिसूचित करील.

(७) मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता धारण करीत असल्याशिवाय, कोणतीही व्यक्ती परिषदेवर नामनिर्देशित केली जाण्यास किंवा निवडली जाण्यास पात्र ठरणार नाही.

४. (१) कलम ३, पोटकलम (३), खंड (छ) खालील निवडणूक, केंद्र सरकारकडून तिने यासंदर्भात केलेल्या अशा नियमांनुसार घेण्यात येईल आणि अशा कोणत्याही नियमात अशी तरतूद करता येईल की, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार भारतीय पशुवैद्यकीय व्यवसायींची नोंदवही तयार होईपर्यंत, त्यामध्ये सूचित केल्याप्रमाणे, त्या खंडात निर्देशिलेल्या सदस्यांची निवडणूक न होता केंद्र सरकारकडून नामनिर्देशित करण्यात येतील. **सदस्यांच्या निवडणुकीची पद्धत.**

(२) परिषदेच्या कोणत्याही निवडणुकीसंबंधात कोणताही विवाद उद्‌भवल्यास, तो केंद्र सरकारकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल आणि त्याचा, त्यावरील निर्णय अंतिम असेल.

५. (१) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष तीन वर्षांपेक्षा अधिक होणार नाही एवढ्या कालावधीसाठी पद धारण करील, आणि त्यांचा सदस्य म्हणून असणारा पदावधी संपल्यानंतर असे पद धारण करणार नाही. **अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य यांचा पदावधी.**

(२) या कलमाच्या तरतुदींस अधीन राहून, पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त अन्य सदस्य, त्यांची परिषदेवर निवडणूक झाल्याच्या किंवा नामनिर्देशन झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या मुदतीकरिता किंवा त्याचा उत्तराधिकारी रीतसर निवडून येईपर्यंत किंवा नामनिर्देशित होईपर्यंत यापैकी नंतरची असेल त्या मुदतीपर्यंत पद धारण करील.

(३) परिषदेचे सदस्य पुनर्नामनिर्देशनास किंवा पुनर्निवडणुकीस पात्र असतील.

(४) कोणत्याही सदस्याची तीन वर्षांची मुदत संपण्याच्या बेतात असेल अशा प्रसंगी, उक्त मुदत संपण्यापूर्वी तीन महिन्यांत कोणत्याही वेळी त्याचा उत्तराधिकारी नामनिर्देशित केला जाऊ शकेल किंवा निवडला जाऊ शकेल, परंतु नवा सदस्य उक्त पदावधी संपेपर्यंत पद धारण करणार नाही.

६. (१) पुढील प्रसंगी सदस्याने त्याचे पद रिक्त केले आहे, असे मानण्यात येईल,— **सदस्यत्व संपुष्टात येणे.**

(क) परिषदेच्या लागोपाठच्या तीन बैठकींना परिषदेच्या मते पुरेशा नसणाऱ्या कारणांसाठी तो अनुपस्थित राहिल्यास ;

(ख) तो त्याला ज्या पदावर नामनिर्देशित करण्यात आले असेल त्या पदावर राहण्याचे त्याने बंद केल्यास ;

(ग) कलम ३, पोटकलम (३), खंड (छ) अन्वये निवड झालेल्या सदस्याच्या बाबतीत, तो नोंदवहीत नाव नोंदलेली व्यक्ती म्हणून न राहिल्यास;

(घ) नैतिक अधःपाताचा समावेश असणारा आणि कारावासाची शिक्षा होऊ शकेल असा अपराध केल्याबद्दल तो सिद्धदोषी ठरल्यास;

(ङ) तो अविमुक्त नादार असल्यास;

(च) तो विकल मनाचा असल्यास आणि सक्षम न्यायालयाने त्याला तसे घोषित केल्यास.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले रिक्त पद निर्माण झाल्यास, अध्यक्ष ती बाब केंद्र सरकारला तावडतोब कळवील आणि त्यानंतर ते सरकार, कलम ७ च्या परंतुकास अधीन राहून असे रिक्त पद भरण्यासाठी आवश्यक उपाय योजू शकेल.

७. परिषदेतील नैमित्तिक रिक्त पदे, नामनिर्देशनाने किंवा, यथास्थिति, निवडणुकीने भरण्यात येतील आणि रिक्त पद भरण्यासाठी नामनिर्देशित केलेली किंवा निवडलेली व्यक्ती ती ज्याच्या जागेवर नामनिर्देशित केली असेल किंवा निवडली असेल त्या सदस्याच्या उर्वरित कालावधीपुरतीच पद धारण करील : **नैमित्तिक रिक्त पदे.**

परंतु, नामनिर्देशित किंवा निवडलेल्या पदासंबंधात नेहमीचा पदावधी संपण्याच्या तारखेपूर्वी तीन महिन्यांत निर्माण होणारे असे कोणतेही रिक्त पद या कलमानुसार भरण्याची आवश्यकता नाही.

८. (१) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, कोणत्याही वेळी परिषदेला संबोधून लेखी नोटिशीद्वारे त्याच्या पदाचा राजीनामा सचिवाच्या स्वाधीन करील आणि तो राजीनामा परिषद ज्या दिनांकास स्वीकारील तो दिनांक किंवा सचिवाकडे राजीनामा पोचल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त होण्याचा दिनांक यांपैकी जो अगोदरचा असेल त्या दिनांकापासून अंमलात येईल. **राजीनामा.**

(२) सदस्य, अध्यक्षाला उद्देशून लेखी दिलेल्या नोटिशीद्वारे कोणत्याही वेळी त्याच्या पदाचा राजीनामा देऊ शकेल आणि असा प्रत्येक राजीनामा, अध्यक्ष ज्या दिनांकास स्वीकारील तो दिनांक किंवा अध्यक्षाला राजीनामा पोचल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त होण्याचा दिनांक यांपैकी जो अगोदरचा असेल त्या दिनांकापासून अंमलात येईल.

९. (१) परिषद, ती ठरवील अशा वेळी व अशा ठिकाणी वर्षातून निदान दोन वेळा बैठका घेईल. **परिषदेच्या बैठका.**

(२) परिषदेच्या बैठकीच्या कामकाजासाठी आवश्यक गणपूर्ती नऊ जणांच्या उपस्थितीने होईल.

(३) अध्यक्ष उपस्थित असेल तेव्हा तो परिषदेच्या प्रत्येक बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल आणि त्याच्या अनुपस्थितीत, उपाध्यक्ष अध्यक्षस्थानी असेल आणि दोघांच्या अनुपस्थितीत, सदस्य त्यांच्यामधून निवडतील असा इतर कोणताही सदस्य बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल.

(४) या अधिनियमामध्ये अन्य प्रकारे तरतूद केलेली असेल ते खेरीजकरून, परिषदेच्या बैठकीसमोर येणाऱ्या सर्व प्रश्नांवर उपस्थित असणाऱ्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेतले जातील.

(५) समसमान मते पडतील त्याबाबतीत, अध्यक्ष आपले निर्णायक मत देईल.

(६) पोटकलमे (१) ते (५) यांच्या तरतुदींना अधीन राहून, परिषद, आपल्या बैठकीच्या वेळी कामकाज चालवण्याच्या संदर्भात विनियमांद्वारे तरतूद केल्यानुसार कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करील.

**परिषदेवरील पद रिक्त राहिल्यामुळे कृती, इत्यादी अवैध न ठरणे.**

१०. परिषदेची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ परिषदेवरील पद रिक्त असणे अथवा परिषदेच्या रचनेमध्ये कोणताही दोष किंवा अनियमितता असणे या कारणांमुळे अवैध ठरणार नाही.

**सचिव व इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांची नियुक्ती.**

११. (१) परिषद, केंद्र सरकारच्या पूर्व मंजुरीने सचिवाची नियुक्ती करू शकेल (परिषदेने कोषपाल म्हणून इतर कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती न केल्यास सचिव हाच कोषपाल म्हणून देखील काम करील.) आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटेल अशा इतर अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू शकेल.

(२) परिषदेने नियुक्त केलेला सचिव, इतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सेवाविषयक अटी व शर्ती विनियमांद्वारे तरतूद केल्याप्रमाणे असतील.

(३) परिषदेचा सचिव, अधिकारी व इतर कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

(४) परिषदचे सर्व आदेश, निर्णय व इतर विलेख यांना सचिवाच्या सहीने किंवा परिषदेने या बाबतीत रीतसर प्राधिकृत केलेल्या इतर अधिकाऱ्याच्या सहीने अधिकृत स्वरूप प्राप्त होईल.

**कार्यकारी समिती व इतर समित्या.**

१२. (१) परिषद आपल्या सदस्यांमधून एका कार्यकारी समितीची नेमणूक करील आणि परिषदेला आवश्यक वाटणाऱ्या सर्वसाधारण किंवा विशेष प्रयोजनांसाठी इतर समित्या घटित करता येतील आणि कार्यकारी समिती व्यतिरिक्त कोणत्याही समितीला कोणत्याही बाबतीत सल्ला देण्यासाठी विशेष पात्रता असणाऱ्या कोणत्याही एका व्यक्तीस किंवा अधिक व्यक्तींना स्वीकृत सदस्य म्हणून घेता येईल.

(२) या कलमाद्वारे घटित केलेली समिती, विनियमांद्वारे तरतूद केलेल्या वेळी आणि ठिकाणी बैठक घेईल आणि बैठकीच्या कामकाजासाठी तरतूद करण्यात येईल अशा कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करील.

**शुल्क व भत्ते.**

१३. अध्यक्ष आणि सदस्य, तसेच समित्यांचे सदस्य (परिषद सदस्यांव्यतिरिक्त) यांना परिषदेच्या व समित्यांच्या बैठकांना उपस्थित राहण्यासाठी विनियमांद्वारे तरतूद केल्याप्रमाणे शुल्क व भत्ते देण्यात येतील.

**परिषदेने द्यावयाची माहिती व तिचे प्रकाशन.**

१४. (१) परिषद, शासन फर्मावील असे अहवाल, कार्यवृत्तांच्या प्रती, हिशेबाचा सारांश आणि इतर माहिती, केंद्र सरकारला देईल.

(२) केंद्र सरकार, या कलमाखाली त्यास देण्यात आलेला कोणताही अहवाल, प्रत, गोषवारा किंवा कोणतीही माहिती, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने प्रकाशित करू शकेल.

**भारतातील पशुवैद्यक संस्थांद्वारे देण्यात आलेल्या पशुवैद्यक अर्हतांना मान्यता देणे.**

१५. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, अनुसूची एक मध्ये ज्यांचा समावेश करण्यात आलेला आहे अशा भारतातील कोणत्याही पशुवैद्यक संस्थांद्वारे देण्यात आलेल्या पशुवैद्यक अर्हता ह्या मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता असतील.

(२) अनुसूची एक मध्ये अंतर्भाव करण्यात न आलेल्या पशुवैद्यक अर्हता जिच्याद्वारे देण्यात येतात अशा भारतातील कोणत्याही पशुवैद्यक संस्थेला अशा अर्हतेस मान्यता देण्यात यावी यासाठी केंद्र सरकारकडे अर्ज करता येईल आणि केंद्र सरकार, परिषदेबरोबर विचारविनिमय केल्यानंतर, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अनुसूची एक मध्ये अशी अर्हता समाविष्ट करता यावी यासाठी त्या अनुसूचीमध्ये सुधारणा करता येईल आणि कोणत्याही अशा अधिसूचनेद्वारे असाही निदेश देता येईल की, अनुसूची दोनच्या अखेरच्या स्तंभात अशा पशुवैद्यक अर्हतेसमोर, विनिर्दिष्ट दिनांकानंतर ती देण्यात आली असेल, केवळ तेव्हाच ती मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता ठरेल असे घोषित करणारी नोंद करण्यात येईल.

१६. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, अनुसूची दोनमध्ये ज्यांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे, अशा भारताबाहेरील पशुवैद्यक संस्थांद्वारे देण्यात आलेल्या पशुवैद्यक अर्हता, मान्यता प्राप्त पशुवैद्यक अर्हता असतील.

**ज्या देशांबरोबर अन्योन्यतेची योजना अस्तित्वात आहे तेथील पशुवैद्यक संस्थांद्वारे देण्यात आलेल्या पशुवैद्यक अर्हतांना मान्यता देणे.**

(२) परिषदेत भारताबाहेरील कोणत्याही देशातील कायद्याद्वारे ज्यांच्याकडे पशुवैद्यकीय व्यवसायींची नोंदवही ठेवण्याचे काम सोपविण्यात आले आहे अशा देशांतील प्राधिकरणाबरोबर पशुवैद्यक अर्हतांच्या मान्यतेसाठी अन्योन्यतेची योजना सुरू करण्याकरिता वाटाघाटी करू शकेल, आणि अशा कोणत्याही योजनेस अनुसरून, केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे परिषदेने ज्या पशुवैद्यक अर्हतेला मान्यता देण्यात यावी असे ठरविले असेल, ती अर्हता दुसऱ्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करता यावी म्हणून ती अनुसूचीत सुधारणा करू शकेल आणि अशा कोणत्याही अधिसूचनेद्वारे असाही निदेश देता येईल की, अनुसूची दोनच्या अखेरच्या स्तंभामध्ये अशा पशुवैद्यकीय अर्हतेसमोर, ती विनिर्दिष्ट दिनांकानंतर देण्यात आली असेल तेव्हाच ती मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता ठरेल असे घोषित करणारी नोंद करण्यात येईल.

(३) केंद्र सरकारला, परिषदेबरोबर विचारविनिमय केल्यानंतर, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणत्याही पशुवैद्यक अर्हतेच्या संबंधात, ती विनिर्दिष्ट दिनांकानंतर देण्यात आली असेल तेव्हाच ती मान्यता प्राप्त पशुवैद्यक अर्हता ठरेल असे घोषित करणारी नोंद अनुसूची दोनमध्ये करण्यात यावी, अशा निदेशाद्वारे त्यात सुधारणा करता येईल.

(४) पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्राधिकरणाद्वारे मान्यतेकरिता प्रस्तावित करण्यात आलेल्या कोणत्याही पशुवैद्यक अर्हतेची शिफारस करण्याचे परिषदेने नाकारले असेल आणि प्राधिकरणाने याबाबतीत केंद्र सरकारकडे अर्ज केला असेल त्याबाबतीत, केंद्र सरकार, असा अर्ज विचारात घेतल्यानंतर आणि कोणत्याही अशा नकारासंबंधीच्या कारणाबाबतचा कोणताही असल्यास, अहवाल परिषदेकडून मिळाल्यानंतर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा अर्हतांचा अनुसूची दोनमध्ये अंतर्भाव करता यावा यासाठी तीमध्ये सुधारणा करू शकेल आणि अशा अधिसूचनेस पोटकलम (२) च्या तरतुदी लागू होतील.

१७. (१) केंद्र सरकार परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, ज्या संबंधात पशुवैद्यक अर्हतांच्या मान्यतेसाठी अन्योन्यतेची योजना अंमलात नाही अशा भारताबाहेरील कोणत्याही देशामधील पशुवैद्यक संस्थांद्वारे देण्यात आलेल्या पशुवैद्यक अर्हता या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता असल्याचे समजण्यात येईल किंवा त्या विनिर्दिष्ट दिनांकानंतर देण्यात आल्या असतील तेव्हा त्या तशा असल्याचे समजण्यात येईल :

**अन्योन्यतेची कोणतीही योजना अस्तित्वात नसेल अशा देशांतील पशुवैद्यक संस्थांनी दिलेल्या पशुवैद्यक अर्हतांच्या विवक्षित प्रकरणातील मान्यतेसाठी विशेष तरतूद.**

परंतु, अशा अर्हता असलेल्या व्यक्तींना केलेला पशुवैद्यक व्यवसाय हा,—

(क) त्या देशामध्ये त्या काळी अस्तित्वात असलेल्या पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदणीचे विनियमन करण्यासाठी असलेल्या कायद्यानुसार अशा व्यक्तींची पशुवैद्यक व्यवसायी म्हणून नाव नोंदणी झालेली असेल तरच अनुज्ञेय असेल;

(ख) अध्यापन संशोधनकार्य, धर्मादायकार्य या प्रयोजनार्थ, ते त्याकाळी ज्या संस्थेशी संलग्न असतील अशा संस्थेपुरते मर्यादित राहील ; आणि

(ग) केंद्र सरकारने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपुरता मर्यादित राहील.

(२) केंद्र सरकार, अशा कोणत्याही पशुवैद्यक अर्हतांच्या बाबतीत परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी देण्यात आल्या असतील तेव्हाच केवळ त्या मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता असतील, असा निदेश देऊ शकेल.

१८. ज्यांच्याद्वारे मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता देण्यात येतात अशी राज्यातील प्रत्येक पशुवैद्यक संस्था, अशी अर्हता प्राप्त करण्यासाठी लागणारा अभ्यासक्रम आणि द्यावयाची परीक्षा याविषयी असा अभ्यासक्रम आणि अशी परीक्षा ज्या वयांमध्ये देणे आवश्यक आहे अशा वयाविषयी आणि प्रदान करण्यात येईल अशा अर्हतेविषयी सर्वसाधारणपणे अशी अर्हता प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी याविषयी परिषद वेळोवेळी फर्मावू शकेल अशी माहिती पुरवील.

**अभ्यासक्रम व परीक्षा यांविषयीची माहिती देण्यास फर्माविण्याचा अधिकार.**

१९. (१) कलम १२ अन्वये घटित केलेली समिती, परिषदेने केलेल्या कोणत्याही विनियमांच्या अधीन कोणतीही पशुवैद्यक संस्था किंवा जेथे पशुवैद्यक शिक्षण दिले जाते असे कोणतेही महाविद्यालय किंवा केंद्र सरकारकडून पशुवैद्यक अर्हतेला मान्यता प्राप्त होण्यासाठी शिफारस करण्याच्या प्रयोजनासाठी घेतली जाणारी कोणतीही परीक्षा घेणारी पशुवैद्यक संस्था यांची तपासणी करण्यासाठी पुरेशा संख्येत पशुवैद्यक निरीक्षक नियुक्त करू शकेल.

**पशुवैद्यक संस्था आणि परीक्षा यांचे निरीक्षण.**

(२) पशुवैद्यक निरीक्षक कोणतेही प्रशिक्षण देणे किंवा परीक्षा घेणे यामध्ये हस्तक्षेप करणार नाहीत, पण ते कर्मचारी वर्ग, साधनसामग्री, जागा, प्रशिक्षण किंवा पशुवैद्यक शिक्षण घेण्यासाठी विनियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या इतर सोयी यांसह पशुवैद्यक शिक्षणाच्या मानकांच्या समुचिततेविषयी किंवा ते उपस्थित राहतील अशा प्रत्येक परीक्षेच्या पर्याप्ततेविषयी समितीकडे अहवाल अग्रेषित करतील.

(३) समिती, कोणत्याही अशा अहवालाची प्रत संबंधित पशुवैद्यक संस्थेकडे पाठवील तसेच त्यावर उक्त संस्थेचे कोणतेही अभिप्राय असल्यास, अशा अभिप्रायांची प्रत केंद्र सरकारकडेही अग्रेषित करील.

**वीक्षकांची नियुक्ती.**

२०. (१) परिषद, जेथे पशुवैद्यक शिक्षण देण्यात येते अशा कोणत्याही पशुवैद्यकीय संस्थेचे किंवा कोणत्याही महाविद्यालयाचे किंवा इतर संस्थेचे निरीक्षण करण्यासाठी किंवा कोणतीही मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता देण्यासाठी कोणत्याही पशुवैद्यक संस्थेने घेतलेल्या कोणत्याही परीक्षेस उपस्थित राहण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा पुरेशा प्रमाणात वीक्षकांची नियुक्ती करू शकेल.

(२) कोणत्याही व्यक्तीची मग ती सदस्य असो किंवा नसो या कलमाखाली वीक्षक म्हणून नियुक्ती करता येईल, मात्र ज्या व्यक्तीची कलम १९ अन्वये निरीक्षणासाठी किंवा तपासणीसाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे अशा व्यक्तीची तशाच निरीक्षणासाठी किंवा तपासणीसाठी वीक्षक म्हणून नियुक्ती करता येणार नाही.

(३) वीक्षक कोणतेही प्रशिक्षण किंवा परीक्षा आयोजित करण्याच्या कामामध्ये हस्तक्षेप करणार नाहीत, मात्र कर्मचारीवर्ग, साधनसामुग्री, जागा, प्रशिक्षण व पशुवैद्यक शिक्षण देण्यासाठी विनियमांद्वारे विहित केलेल्या सोयी देण्याकरिता पशुवैद्यक शिक्षणाच्या मानकांच्या समुचिततेविषयी किंवा ते उपस्थित राहतील अशा प्रत्येक परीक्षेच्या पर्याप्ततेविषयी अध्यक्षाकडे अहवाल पाठवतील.

(४) कोणत्याही विवक्षित प्रकरणांमध्ये अध्यक्षाने अन्यथा निदेश दिले असतील ते खेरीज करून वीक्षकांचा अहवाल गोपनीय म्हणून मानण्यात येईल :

परंतु, केंद्र सरकारला वीक्षकांच्या अहवालाची आवश्यकता भासल्यास, परिषद ते पुरवील.

**मान्यता काढून घेणे.**

२१. (१) समितीच्या किंवा वीक्षकांच्या अहवालावरून समितीला असे वाटते की,—

(क) अभ्यास पाठ्यक्रम व द्यावयाच्या परीक्षा किंवा कोणत्याही पशुवैद्यक संस्थेद्वारे घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षांमध्ये उमेदवारांकडून आवश्यक असलेले नैपुण्य हे या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांशी सुसंगत नाही किंवा त्याद्वारे आवश्यक असलेल्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे आहे, किं

(ख) अशा पशुवैद्यक संस्थेमध्ये किंवा कोणत्याही महाविद्यालयांमध्ये किंवा त्याच्याशी असलेल्या कोणत्याही संस्थेमध्ये अध्यापन व प्रशिक्षण यासाठी तरतूद करण्यात आलेला क वर्ग, साधनसामग्री, जागा, प्रशिक्षण व इतर सोयी या परिषदेने विहित केलेल्या दर्जाशी सुसंगत न

—तर परिषद, केंद्र सरकारकडे त्याबाबत अभिवेदन करील.

(२) असे अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, केंद्र सरकार अशी पशुवैद्यक संस्था ज्या राज्यामध्ये स्थित आहे अशा राज्य शासनाकडे ते पाठवू शकेल आणि राज्य शासनास देणे आवश्यक वाटेल अशा अभिप्रायासह त्या संस्थेने आपले स्पष्टीकरण ज्या कालावधीमध्ये राज्य शासनास सादर करावयाचे आहे तो कालावधी कळवून पशुवैद्यक संस्थेकडे अग्रेषित करील.

(३) स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर किंवा नियत कालावधीच्या आत कोणतेही स्पष्टीकरण सादर करण्यात आले नसेल त्याबाबतीत, तो कालावधी समाप्त झाल्यावर, राज्य शासन केंद्र सरकारकडे आपल्या शिफारशी करील.

(४) केंद्र सरकार, त्यास योग्य वाटेल अशी कोणतीही चौकशी केल्यानंतर **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे समुचित अनुसूचीमध्ये उक्त पशुवैद्यक अर्हता समोर, ती विनिर्दिष्ट तारखेपूर्वी देण्यात आली असेल तेव्हाच मान्यतापात्र पशुवैद्यक अर्हता ठरेल किंवा जर उक्त पशुवैद्यक अर्हता विनिर्दिष्ट महाविद्यालयाच्या किंवा कोणत्याही पशुवैद्यक संस्थेशी संलग्न असलेल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना देण्यात आली असेल तर ती विनिर्दिष्ट तारखेपूर्वी देण्यात आली असेल तेव्हाच किंवा, यथास्थिति, मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता असेल किंवा, यथास्थिति, उक्त पशुवैद्यक अर्हता ही विनिर्दिष्ट महाविद्यालय किंवा कोणत्याही संस्थेशी संलग्न असलेली संस्था यांनी विनिर्दिष्ट तारखेनंतर दिलेली असेल तेव्हाच मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता ठरेल अशी नोंद घेण्यात यावी, असा निदेश देऊ शकेल :

परंतु, अशी अधिसूचना काढण्यापूर्वी केंद्र सरकार, भारतीय कृषि संशोधन परिषदेशी विचार-विनिमय करू शकेल.

**पशुवैद्यक शिक्षणाचा किमान दर्जा.**

२२. (१) परिषद, विनियमांद्वारे हा अधिनियम ज्या राज्यांमध्ये लागू होतो त्या राज्यांतील पशुवैद्यक संस्थांकडून देण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता देण्यासाठी पशुवैद्यक शिक्षणाची किमान पात्रता विनिर्दिष्ट करू शकेल.

(२) विनियमांच्या मसुद्याच्या प्रती आणि त्यात नंतर झालेल्या सर्व सुधारणांच्या प्रती परिषदेकडून राज्य शासनाला पुरविण्यात येतील आणि असे विनियम किंवा, यथास्थिति, त्याच्या कोणत्याही सुधारणा मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे सादर करण्यापूर्वी परिषद, उपरोक्तप्रमाणे प्रती पुरविण्यात आल्यापासून तीन महिन्यांच्या आत मिळालेले राज्य शासनाचे अभिप्राय विचारात घेईल.

(३) केंद्र सरकार, असे विनियम किंवा त्यांच्या कोणत्याही सुधारणा यांना मान्यता देण्यापूर्वी भारतीय कृषि संशोधन परिषदेशी विचारविनिमय करील.

(४) कलम १२ खाली घटित करण्यात आलेली समिती, वेळोवेळी विनियमांच्या परिणाम क्षमते-संबंधी परिषदेला कळवील आणि तिला योग्य वाटतील अशा सुधारणांची शिफारस परिषदेस करू शकेल.

## प्रकरण तीन

### भारतीय पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही

२३. (१) परिषद, या अधिनियमाच्या प्रारंभापासूनच शक्य होईल तितक्या लवकर, "भारतीय पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही" या नावाचे ओळखण्यात येईल अशी पशुवैद्यक व्यवसायींची एक नोंदवही विनियमाद्वारे तरतूद करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने ठेवण्याची व्यवस्था करील. या नोंदवहीमध्ये, मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता ज्यांनी धारण केली आहे, आणि हा अधिनियम ज्या राज्याला लागू होतो त्या राज्याच्या राज्य पशुवैद्यक नोंदवहीमध्ये ज्यांची नावे त्या त्या वेळी नोंदलेली आहेत अशी सर्व व्यक्तींची नावे अंतर्भूत असतील. **भारतीय पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही.**

(२) या अधिनियमाच्या तरतुदी आणि परिषदेचे कोणतेही आदेश यांच्या अनुसार भारतीय पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही ठेवणे आणि ती नोंदवही सुधारणे आणि ती **भारताच्या राजपत्रात** किंवा विनियमाद्वारे तरतूद करण्यात येईल त्यानुसार, या अन्य रीतीने प्रकाशित करणे हे परिषदेच्या सचिवाचे कर्तव्य असेल.

(३) अशी नोंदवही ही, भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) याच्या अर्थानुसार सार्वजनिक दस्तऐवज असेल आणि **भारताच्या राजपत्रात** प्रकाशित केलेल्या प्रतीवरून तसे शाबीत करता येईल.

(४) प्रत्येक राज्य पशुवैद्यक परिषद, परिषदेला प्रत्येक वर्षी १ एप्रिलनंतर होईल तितक्या लवकर राज्य पशुवैद्यक नोंदवहीच्या सहा प्रती पाठवील आणि प्रत्येक राज्य पशुवैद्यक परिषद, राज्य पशुवैद्यक नोंदवहीमध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सर्व जादा नोंदी व त्यामध्ये करण्यात आलेल्या अन्य सुधारणा विनाविलंब परिषदेला कळवील.

२४. परिषदेचा सचिव, एखाद्या राज्य पशुवैद्यक नोंदवहीमध्ये एखाद्या व्यक्तीची नोंद करण्यात आलेली असल्याचे कळवण्यात आल्यानंतर किंवा अशा कोणत्याही व्यक्तीकडून विनियमाद्वारे विहित केलेल्या नमुन्यामध्ये आणि तशा रीतीने एखादा अर्ज करण्यात आल्यावर तिचे नाव भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीमध्ये नोंदवील. **भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीतील नोंदणी.**

परंतु, संबंधित व्यक्ती मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता धारण करीत आहे याबद्दल सचिवाची खात्री झालेली असली पाहिजे.

२५. (१) भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीमध्ये जिचे नाव समाविष्ट करण्यात आलेले असेल अशी कोणतीही व्यक्ती, तिने याबाबतीत, विनियमामध्ये तरतूद करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये आणि अशा रीतीने अर्ज केल्यानंतर आणि पंधरा रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढ्या रकमेची फी दिल्यानंतर नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास हक्कदार असेल. **नोंदणी प्रमाणपत्र देणे.**

(२) पोट-कलम (१) खालील अर्ज मिळाल्यानंतर परिषद विनियमामध्ये तरतूद करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये अर्जदाराला नोंदणी प्रमाणपत्र देईल :

परंतु, नोंदवहीमधून त्याचे नाव काढण्यात आल्यानंतर, असे प्रमाणपत्र वैध असण्याचे बंद होईल.

(३) नोंदणी प्रमाणपत्र हरवलेले आहे किंवा नष्ट करण्यात आलेले आहे याबद्दल परिषदेच्या सचिवाची साक्षी होईल अशा प्रकारे दाखवून दिले असेल त्याबाबतीत, सचिव, विनियमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्यानुसार दहा रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी फी दिल्यानंतर, विनियमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यात प्रमाणपत्राची दुसरी प्रत देऊ शकेल.

२६. (१) भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीत नोंदणी झालेल्या कोणत्याही व्यक्तीने तिच्या मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हतेहून अधिक अशी स्नातकोत्तर पदवी किंवा पदविका प्राप्त केली तर, तिने याबाबतीत विनियमामध्ये तरतूद केलेल्या नमुन्यामध्ये आणि अशा रीतीने अर्ज केल्यावर आणि पंधरा रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी फी तिने दिल्यानंतर, अशा नोंदवहीमध्ये तिच्या नावासमोर अगोदर केलेल्या नोंदीव्यतिरिक्त अशी पदवी किंवा पदविका याची आणखी नोंद केली जाण्यास ती व्यक्ती हक्कदार असेल. **जादा अर्हतांची नोंदणी.**

(२) अशा कोणत्याही व्यक्तीच्या संबंधातील राज्य पशुवैद्यक नोंदवहीतील नोंदीमध्ये फेरफार करण्यात येतील त्यानुसार भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीमध्ये करण्यात येतील.

**भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीतून नावे काढणे.**

२७. एखाद्या राज्य पशुवैद्यक नोंदवहीत नोंदलेल्या कोणत्याही व्यक्तीचे नाव, या अधिनियमाखाली प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराच्या अनुरोधाने त्या वहीतून काढण्यात आले तर परिषद, अशा व्यक्तीचे नाव भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीतून काढण्यात यावे असा निदेश देईल.

**भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीत नोंदलेल्या व्यक्तीने निवासस्थान किंवा व्यवसायाचे स्थान यातील बदल कळवणे.**

२८. भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीमध्ये नोंदलेली प्रत्येक व्यक्ती तिचे निवासस्थान किंवा व्यवसायाचे स्थान बदलले असल्यास अशा बदलाबद्दल असा बदल झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत परिषदेला आणि राज्य पशुवैद्यक परिषदेला कळवील, यात कसूर झाल्यास, परिषदेच्या किंवा राज्य पशुवैद्यक सदस्यांच्या निवडणुकीत भाग घेण्याचा त्याचा हक्क केंद्र सरकारच्या आदेशानुसार एकतर कायमचा अथवा त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीकरिता काढून घेतला जाण्यास ती व्यक्ती पात्र ठरेल.

## प्रकरण चार

### नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायींचे विशेषाधिकार

**भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीमध्ये नोंदलेल्या व्यक्तींचे विशेषाधिकार.**

२९. या अधिनियमामध्ये घालून दिलेल्या शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीनतेने, जिचे नाव भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीमध्ये त्या त्यावेळी नोंदविण्यात आले आहे, अशी प्रत्येक व्यक्ती, तिच्या अर्हतांच्या अनुसार, पशुवैद्यक व्यवसायी म्हणून व्यवसाय करण्यास आणि अशा व्यवसायाच्या संबंधातील कोणताही खर्च, औषधोपचारांच्या आणि उपकरणांच्या संबंधातील आकार किंवा कोणतीही फी आकारण्यात हक्कदार असेल ती कोणतीही फी, कायद्यानुसार यथावकाश वसूल करण्यास हक्कदार असेल.

**भारतीय पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीमध्ये नाव नोंदण्यात आलेल्या व्यक्तींचे अधिकार.**

३०. नोंदलेल्या पशुवैद्यक व्यवसायींव्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती,---

(क) शासनाकडील किंवा स्थानिक वा अन्य प्राधिकरण चालवत असलेल्या कोणत्याही संस्थेमधील पशुवैद्यक भिषक किंवा शल्यचिकित्सक म्हणून अथवा इतर कोणतेही तत्सम पद (मग ते कोणत्याही नावाने संबोधले जात असो) धारण करणार नाही;

(ख) कोणत्याही राज्यामध्ये पशुवैद्यक औषधशास्त्राचा व्यवसाय करणार नाही:

परंतु, कोणत्याही राज्याच्या पशुसंवर्धन संचालनालयाने (मग ते कोणत्याही नावाने संबोधले जात असो) किंवा भारतातील कोणत्याही पशुवैद्यक संस्थेने दिलेली पशुवैद्यकीय पर्यवेक्षकाची, पशुपालाची किंवा पशुधन सहायकाची (मग त्याला कोणत्याही नावाने संबोधले जात असो) पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीने नोंदलेल्या पशुवैद्यक व्यवसायीच्या देखरेखीखाली आणि निदेशाखाली किरकोळ पशुवैद्यक सेवा करावी म्हणून राज्य शासन आदेशाद्वारे तिला परवानगी देऊ शकेल.

**स्पष्टीकरण.**---"किरकोळ पशुवैद्यक सेवा" याचा अर्थ, लस टोचणी, खच्चीकरण आणि जखमांवर उपचार करणे यासारखी प्रारंभिक पशुवैद्यकीय मदत आणि राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील, अशी अन्य प्रकारची प्रारंभिक मदत किंवा अशा आजारांवर उपचार करणे, असा आहे;

(ग) कोणत्याही कायद्याद्वारे अर्हताप्राप्त पशुवैद्यक व्यवसायीने, पशुवैद्यक आरोग्य प्रमाणपत्र किंवा कोणतेही इतर प्रमाणपत्र ज्यावर सही किंवा अधिप्रमाणित करणे आवश्यक आहे अशा पशुवैद्यक आरोग्य प्रमाणपत्र किंवा कोणतेही इतर प्रमाणपत्र यांवर सही किंवा अधिप्रमाणित करण्यास हक्कदार असणार नाही.

(घ) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) याच्या कलम ४५ अन्वये तज्ञ म्हणून पशुऔषधवैद्यकाशी संबधित असलेल्या कोणत्याही बाबीवर कोणत्याही मरणान्वेषणाच्या (इनक्वेस्टच्या) वेळी किंवा कोणत्याही न्यायालयामध्ये साक्ष देण्यास हक्कदार असणार नाही.

## प्रकरण पाच

### शिस्त

**व्यावसायिक वर्तणूक.**

३१. (१) परिषद, पशुवैद्यक व्यवसायीसाठी व्यावसायिक वर्तणुकीची व शिष्टाचाराची मानके आणि आचार संहिता विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करू शकेल.

(२) परिषदेने, पोटकलम (१) खाली केलेल्या विनियमांचा कोणताही भंग कोणत्याही व्यावसायिक गैरवर्तणूकीच्या बाबतीत अतिनिंद्य वर्तणूक म्हणजेच व्यावसायिक गैरवर्तणूक ठरेल हे त्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करू शकेल आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी अशा तरतुदी अंमलात येतील.

## प्रकरण सहा

### राज्य पशुवैद्यक परिषदा

**राज्य पशुवैद्यक परिषदांची स्थापना व रचना.**

**३२.** (१) कलम ३३ अन्वये केलेल्या करारानुसार संयुक्त राज्य पशुवैद्यक परिषद घटित केली असेल त्या व्यतिरिक्त, इतर बाबतीत राज्य शासन पुढील सदस्यांचा समावेश असलेली राज्य पशुवैद्यक परिषद घटित करील; ते सदस्य पुढीलप्रमाणे :—

(क) राज्य पशुवैद्यक नोंदवहीमध्ये नोंदणी झालेल्या पशुवैद्यक व्यवसायींनी त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे चार सदस्य;

(ख) राज्यात कोणत्याही पशुवैद्यक संस्था असल्यास त्या संस्थांचे प्रमुख, पदसिद्ध;

(ग) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे तीन सदस्य;

(घ) राज्याचा पशुवैद्यक सेवा संचालक (मग त्याला कोणत्याही नावाने संबोधले जात असो), पदसिद्ध;

(ङ) कोणताही राज्य पशुवैद्यक अधिसंघ असल्यास, त्या अधिसंघाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य;

(च) राज्य पशुवैद्यक परिषदेचा प्रबंधक, पदसिद्ध.

(२) राज्य शासन सदस्य, म्हणून नामनिर्देशित केलेल्या किंवा निवडून दिलेल्या व्यक्तींची नावे **शासकीय राजपत्रामध्ये** अधिसूचित करील.

(३) एखाद्या व्यक्तीकडे मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता असल्याखेरीज ती व्यक्ती राज्य पशुवैद्यक परिषदेचा सदस्य म्हणून तिचे नामनिर्देशन किंवा निवड होण्यास अर्हताप्राप्त ठरणार नाही.

**आंतरराज्यीय करार.**

३३. (१) दोन किंवा अधिक राज्य शासनांना,—

(क) सर्व सहभागी राज्यांकरिता संयुक्त राज्य पशुवैद्यक परिषद घटित करण्याचा; किंवा

(ख) एका राज्याच्या राज्य पशुवैद्यक परिषदेने अन्य सहभागी राज्यांच्या गरजा भागवण्याची तरतूद करण्यासाठी एक करार करता येईल, आणि तो करार त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत अंमलात राहील आणि विनिर्दिष्ट करण्यात येतील असे कोणतेही आणखी कालावधी असल्यास, त्या कालावधीपर्यंत त्याचे नवीकरण होण्याच्या अधीन असेल.

(२) या कलमाखालील करारामध्ये या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या आहेत अशा बाबींशिवाय आणखी,—

(क) राज्य पशुवैद्यक परिषदेच्या किंवा संयुक्त राज्य पशुवैद्यक परिषदेच्या संबंधातील खर्चाचे सहभागी राज्यांमध्ये वाटप करण्याची तरतूद करता येईल;

(ख) या अधिनियमाखालील राज्य शासनाची विविध कामे सहभागी राज्य शासनांपैकी कोणते राज्य शासन पार पाडील ते ठरवता येईल आणि या अधिनियमामध्ये केलेल्या राज्य शासना-संबंधीच्या संदर्भाचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल;

(ग) सहभागी राज्य शासनांमध्ये सर्वसाधारणपणे किंवा या अधिनियमाखाली उद्भवणाऱ्या विशिष्ट बाबींच्या संदर्भात विचारविनिमय होण्याची तरतूद करता येईल;

(घ) करार अंमलात आणण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटेल त्याप्रमाणे या अधिनियमाशी विसंगत नसतील अशा आनुषंगिक आणि सहाय्यभूत तरतुदी करता येतील.

(३) या कलमाखालील करार सहभागी राज्यांच्या **शासकीय राजपत्रामध्ये** प्रकाशित करण्यात येईल.

**संयुक्त राज्य पशुवैद्यक परिषदांची रचना.**

**३४.** (१) संयुक्त राज्य पशुवैद्यक परिषदेमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) प्रत्येक सहभागी राज्याच्या नोंदवहीमध्ये नोंदणी झालेल्या पशुवैद्यक व्यवसायींनी त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे दोन सदस्य;

(ख) सहभागी राज्यांमध्ये कोणत्याही पशुवैद्यक संस्था असल्यास, त्या संस्थांचे प्रमुख, पदसिद्ध;

(ग) प्रत्येक सहभागी राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य;

(घ) प्रत्येक सहभागी राज्याचा पशुवैद्यक सेवा संचालक, मग त्याला कोणत्याही नावाने संबोधले जात असो, पदसिद्ध;

(ङ) प्रत्येक सहभागी राज्याचा कोणताही राज्य पशुवैद्यक अधिसंघ असल्यास, त्या संघाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य;

(च) संयुक्त राज्य पशुवैद्यक परिषदेचा प्रबंधक, पदसिद्ध.

(२) राज्य शासनाने सदस्य म्हणून नामनिर्देशित करावयाच्या किंवा निवडून द्यावयाच्या व्यक्तींची नावे राज्यांच्या शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येतील.

(३) एखाद्या व्यक्तीकडे मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता असल्याखेरीज, ती व्यक्ती संयुक्त राज्य पशुवैद्यक परिषदेचा सदस्य म्हणून तिचे नामनिर्देशन किंवा निवड होण्यासाठी अर्हताप्राप्त ठरणार नाही.

**राज्य पशुवैद्यक परिषदांचे विधिद्वारा संस्थापन.** ३५. प्रत्येक राज्य पशुवैद्यक परिषद ही राज्य शासन शासकीय राजपत्रात अधिसूचित करील अशा नावाचा किंवा संयुक्त राज्य पशुवैद्यक परिषदेच्या बाबतीत, करारात ठरविण्यात येईल अशा नावाचा एक निगम निकाय असेल तिची अखंड परंपरा असेल, तिची सामाईक मोहोर असेल, तिला जंगम आणि स्थावर अशा दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन व धारण करण्याचा अधिकार असेल व त्या नावाने तिला किंवा तिच्यावर दावा लावता येईल.

**अध्यक्ष.** ३६. राज्य पशुवैद्यक परिषदेचे सदस्य, विहित करण्यात येईल अशारीतीने, त्यांच्याकडून त्या परिषदेच्या अध्यक्षास निवडून देतील.

**निवडणुकांची पद्धत** ३७. या प्रकरणाखालील निवडणूक विहित रीतीने घेण्यात येईल आणि अशा कोणत्याही निवडणुकी-बाबत कोणताही वाद उद्भवेल त्या वेळी तो वाद राज्य शासनाकडे त्याच्या निर्णयासाठी पाठविण्यात येईल.

**पदावधी आणि नैमित्तिक रिक्त पदे.** ३८. (१) या कलमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, पदसिद्ध सदस्यखेरीजकरून, राज्य पशुवैद्यक परिषदेचा अन्य सदस्य राज्य पशुवैद्यक परिषदेवर त्याची निवड किंवा नामनिर्देशन झाल्याच्या दिनांका-पासून तीन वर्षांचा कालावधी किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्याची यथोचितरीत्या निवड अथवा त्याचे नाम-निर्देशन होईपर्यंतचा कालावधी यापकी जो अधिक असेल त्या कालावधीपर्यंत पद धारण करेल :

परंतु, कलम ३२, पोटकलम (१), खंड (ग) किंवा कलम ३४, पोटकलम (१), खंड (ग) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेला, राज्य पशुवैद्यक परिषदेचा सदस्य त्याचे नामनिर्देशन करणाऱ्या प्राधिकरणाची मर्जी असेपर्यंत पद धारण करील.

(२) राज्य पशुवैद्यक परिषदेचे सदस्य फेरनिवडीसाठी किंवा, यथास्थिति, पुनर्नामनिर्देशनासाठी पात्र असतील.

(३) राज्य पशुवैद्यक परिषदेच्या निवडून देण्यात आलेल्या किंवा नामनिर्देशित करण्यात आलेल्या सदस्याने आपले पद पुढील बाबतीत रिक्त केले असल्याचे मानण्यात येईल :—

(क) तो सदस्य राज्य पशुवैद्यक परिषदेच्या मते पुरेशी असेल अशा सबबीशिवाय, राज्य पशुवैद्यक परिषदेच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिला तर ;

(ख) त्या सदस्याचे नामनिर्देशन ज्या पदावर करण्यात आले असेल ते पद धारण करण्याचे त्याने बंद केले असेल तर ;

(ग) ज्या सदस्याच्या नावाचा समावेश कोणत्याही राज्य पशुवैद्यक नोंदवहीमध्ये करणे आवश्यक असेल त्याच्या बाबतीत त्याचे नाव नोंदवहीतून काढण्यात आले तर ;

(घ) त्या सदस्यास नैतिक अधःपात आणि कारावासाची शिक्षा अंतर्भूत असणाऱ्या अपराधा-बद्दल दोषी ठरवण्यात आले असेल तर ;

(ङ) तो सदस्य अविमुक्त नादार असेल तर ;

(च) तो सदस्य विकल मनाचा असून सक्षम न्यायालयाने तो तसा असल्याचे घोषित केले असेल तर.

(४) राज्य पशुवैद्यक परिषदेने केलेली कोणतीही कृती राज्य पशुवैद्यक परिषदेच्या आस्थापनेमध्ये कोणतेही रिक्त पद किंवा दोष असल्याच्याच केवळ कारणावरून प्रश्नास्पद ठरणार नाही.

(५) राज्य पशुवैद्यक परिषदेमधील नैमित्तिक रिक्त पद नवीन निवडणूक घेऊन किंवा, यथास्थिति, नवीन नामनिर्देशन करून भरण्यात येईल आणि ते रिक्त पद भरण्यासाठी निवडून दिलेली किंवा नाम-निर्दशित केलेली व्यक्ती ज्याची जागा ती घेईल तो सदस्य ज्यासाठी निवडून दिलेला होता किंवा नामनिर्देशित केलेला होता त्या मुदतीपैकी उरलेल्या मुदतीपर्यंतच केवळ पद धारण करील.

(६) राज्य पशुवैद्यक परिषद, तिच्या बैठकीमध्ये विहित करण्यात येतील अशा, कामकाज चालविण्यासंबंधातील कार्यपद्धतीविषयक अशा नियमांचे पालन करील.

**राजीनामा.** ३९. (१) राज्य पशुवैद्यक परिषदेच्या अध्यक्षाला, राज्य पशुवैद्यक परिषदेला उद्देशून लिहावयाच्या आणि प्रबंधकाकडे सुपूर्द करावयाच्या लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही वेळी, त्याच्या पदाचा राजीनामा देता येईल आणि असा प्रत्येक राजीनामा, अध्यक्षाने तो स्वीकारल्याचा दिनांक किंवा प्रबंधकाला राजीनामा मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त होण्याचा दिनांक यांपैकी जो अगोदरचा असेल त्या दिनांकापासून अंमलात येईल.

(२) राज्य पशुवैद्यक परिषदेच्या सदस्याला, राज्य पशुवैद्यक परिषदेच्या अध्यक्षास उद्देशून लिहावयाच्या लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही वेळी त्याच्या पदाचा राजीनामा देता येईल आणि असा प्रत्येक राजीनामा अध्यक्षाने स्वीकारल्याचा दिनांक किंवा अध्यक्षाला राजीनामा मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त होण्याचा दिनांक यांपैकी अगोदरचा असेल त्या दिनांकापासून तो राजीनामा अंमलात येईल.

४०. विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या व निर्बंधाच्या अधीनतेने, राज्य पशुवैद्यक परिषद तिचा कोणताही अधिकार वापरण्यासाठी किंवा कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी किंवा राज्य पशुवैद्यक परिषद पाठवील अशा कोणत्याही बाबीसंबंधी चौकशी करण्यासाठी, तिच्या संबंधात अहवाल किंवा सल्ला देण्यासाठी कार्यकारी समिती व अन्य समित्या घटित करू शकेल. **कार्यकारी व इतर समित्या.**

४१. राज्य पशुवैद्यक परिषदेचा अध्यक्ष व इतर सदस्य आणि समित्यांचे (राज्य पशुवैद्यक परिषदेच्या सदस्यांव्यतिरिक्त इतर) सदस्य यांना राज्य पशुवैद्यक परिषदेच्या आणि समित्यांच्या बैठकींना हजर राहण्यासाठी विहित करण्यात येईल असे शुल्क व भत्ते देण्यात येतील. **शुल्क व भत्ते.**

४२. (१) राज्य पशुवैद्यक परिषद, राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने प्रबंधकाची नियुक्ती करील आणि राज्य पशुवैद्यक परिषदेने कोषपाल म्हणून काम करण्यासाठी इतर कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती केली नसेल तर, तो कोषपाल म्हणूनही काम करील, आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी परिषदेला आवश्यक वाटतील अशा इतर अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांचीही नियुक्ती करु शकेल. **प्रबंधक आणि इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांची नियुक्ती.**

(२) प्रबंधक आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य पशुवैद्यक परिषदेकडून विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(३) राज्य पशुवैद्यक परिषदेचा प्रबंधक आणि इतर अधिकारी व कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

(४) राज्य पशुवैद्यक परिषदेचे सर्व आदेश आणि निर्णय आणि इतर दस्तऐवज प्रबंधकाच्या किंवा परिषदेने याबाबतीत योग्य रीतीने अधिकार प्रदान केलेल्या राज्य पशुवैद्यक परिषदेच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात येतील.

(५) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य पशुवैद्यक परिषद प्रथम घटित झाल्यानंतरच्या पहिल्या दोन वर्षांमध्ये राज्य पशुवैद्यक परिषदेचा प्रबंधक राज्य शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती असेल आणि राज्य शासनाची मान्यता असेपर्यंत ती पदावर राहील.

४३. (१) राज्य पशुवैद्यक परिषद, राज्य शासन वेळोवेळी फर्मावील असे अहवाल तिच्या कार्यवृत्तांच्या आणि कार्यकारी समितीच्या कार्यवृत्तांच्या प्रती, तिच्या लेख्यांचे गोषवारे राज्य शासनाला पुरवील आणि अशा प्रकारे राज्य शासनाला पुरविण्यात आलेल्या सर्व सामग्रीच्या प्रती परिषदेकडे अग्रेषित करील. **राज्य पशुवैद्यक परिषदेने पुरवावयाची माहिती.**

(२) राज्य शासन, या कलमान्वये त्याला पुरविण्यात आलेले कोणतेही अहवाल, गोषवाऱ्याच्या प्रती त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे प्रकाशित करू शकेल.

## प्रकरण सात

### नोंदणी

४४. (१) राज्य शासन, यात देण्यात आलेल्या पद्धतीनुसार, होईल तितक्या लवकर, राज्यासाठी एक पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही तयार करील व तिला राज्य पशुवैद्यक नोंदवही संबोधण्यात येईल. **राज्य पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही तयार करणे आणि ठेवणे.**

(२) राज्य पशुवैद्यक परिषद, आपल्या स्थापनेनंतर, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार, राज्य पशुवैद्यक नोंदवही ठेवण्याचे कर्तव्य स्वीकारील.

(३) राज्य पशुवैद्यक नोंदवहीमध्ये मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींच्या नावांचा समावेश असेल.

(४) राज्य पशुवैद्यक नोंदवहीत पुढील तपशील असतील ते असे :—

(क) नोंदणीकृत व्यक्तीचे संपूर्ण नाव, राष्ट्रीयत्व, निवासी पत्ता;

(ख) राज्य पशुवैद्यक नोंदवहीत तिला दाखल करून घेण्यात आल्याची तारीख;

(ग) नोंदणीसाठी अर्हता आणि अशी अर्हता तिने प्राप्त केल्याची तारीख, आणि ती प्रदान करणारे प्राधिकरण;

(घ) तिचा व्यावसायिक पत्ता; आणि

(ङ) विहित करण्यात येईल असा अन्य तपशील.

**नोंदवही प्रथम तयार करणे.** ४५. (१) राज्य पशुवैद्यक नोंदवही प्रथम तयार करण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नोंदणी न्यायाधिकरण घटित करील, यामध्ये मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता धारण करणाऱ्या तीन व्यक्तींचा समावेश असेल तसेच प्रबंधकाची देखील नियुक्ती करण्यात येईल व तो न्यायाधिकरणाचा सचिव म्हणून कार्य करील.

(२) राज्य शासन, त्याच किंवा तशाच अधिसूचनेद्वारे नोंदणीसाठी ज्या तारखेस किंवा ज्या तारखेपूर्वी नोंदणी न्यायाधिकरणाकडे अर्ज करावयाचा ती तारीख नियत करील, अशा अर्जासोबत विहित करण्यात येईल अशी, पंचवीस रुपयांपेक्षा अधिक नसणारी फी असेल.

(३) नोंदणी न्यायाधिकरण, नियत दिनांकाला किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेल्या अर्जांची तपासणी करील आणि अर्जदार कलम ४६ अन्वये नोंदणी करण्यास पात्र असल्याबद्दल त्याची खात्री झाली तर, अर्जदाराच्या नावाची नोंदवहीत नोंद घेण्याचे निदेश देईल.

(४) अशाप्रकारे तयार करण्यात आलेली नोंदवही त्यानंतर राज्य शासन निदेश देईल अशा रीतीने प्रकाशित करण्यात येईल आणि नोंदणी न्यायाधिकरणाच्या अशाप्रकारे प्रकाशित करण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये व्यक्त केलेल्या किंवा गर्भित निर्णयामुळे पीडित अशा कोणत्याही व्यक्तीला अशा प्रकाशनाच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत, राज्य शासनाने, **शासकीय राजपत्रातील** या बाबतीतील अधिसूचनेद्वारे नियुक्त केलेल्या अपील प्राधिकरणाकडे अपील करता येईल.

(५) प्रबंधक, पोटकलम (४) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या निर्णयानुसार नोंदवहीत सुधारणा करील आणि त्यानंतर, नोंदवहीमध्ये नाव नोंदण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला विहित नमुन्यातील नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(६) राज्य पशुवैद्यक परिषद घटित करण्यात आल्यानंतर नोंदवही तिच्या अभिरक्षेत देण्यात येईल आणि राज्य शासन असे निदेश देईल की, पहिल्या नोंदवहीतील नोंदणी अर्जाची संपूर्ण फी किंवा तिचा कोणताही विनिर्दिष्ट भाग, राज्य पशुवैद्यक परिषदेच्या नावे जमा करण्यात येईल.

**नोंदवही तयार झाल्यानंतर नोंदीसाठी अर्हता.** ४६. एखादी व्यक्ती ही राज्यात राहत असेल आणि मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता धारण करीत असेल तर, पंचवीस रुपयांपेक्षा अधिक नाही इतकी विहित फी भरल्यानंतर राज्य पशुवैद्यक नोंदवहीत तिचे नाव नोंदले जाण्यास ती हक्कदार असेल.

**नोंदणीसाठी आलेल्या अर्जांची छाननी.** ४७. (१) कलम ४५ च्या पोटकलम (२) अन्वये नोंदणीसाठी अर्ज पाठवण्यासाठी नियत करण्यात आलेल्या तारखेनंतर नोंदणीसाठी प्राप्त झालेले सर्व अर्ज, राज्य पशुवैद्यक परिषदेच्या प्रबंधकाकडे पाठविण्यात येतील आणि पंचवीस रुपयांपेक्षा अधिक नसलेली विहित फी त्यांच्याबरोबर पाठविण्यात येईल.

(२) अशा अर्जावरुन अर्जदार हा, राज्य पशुवैद्यक नोंदवहीमध्ये त्याचे नाव नोंदण्यास हक्कदार आहे असे राज्य पशुवैद्यक परिषदेच्या प्रबंधकाचे मत असेल तर, तो अर्जदाराच्या नावाची तीमध्ये नोंद करील :

परंतु, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार जिचे नाव कोणत्याही राज्याच्या राज्य पशुवैद्यक नोंदवहीमधून काढून टाकण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती, ज्या राज्य पशुवैद्यक परिषदेच्या नोंदवहीतून तिचे नाव काढून टाकण्यात आले असेल त्या परिषदेच्या मान्यतेशिवाय दुसऱ्या राज्याच्या राज्य पशुवैद्यक नोंदवहीत नाव नोंदले जाण्यास हक्कदार असणार नाही.

(३) राज्य पशुवैद्यक परिषदेच्या प्रबंधकाने, जिचा नोंदणी अर्ज फेटाळला असेल अशी कोणतीही व्यक्ती अशा फेटाळणीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत राज्य पशुवैद्यक परिषदेकडे अपील करू शकेल.

(४) राज्य पशुवैद्यक परिषदेच्या पोटकलम (३) खालील निर्णयामुळे पीडित अशी कोणतीही व्यक्ती, तिला असा निर्णय कळविण्यात आल्यापासून साठ दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करू शकेल.

(५) या कलमान्वये एखाद्या नावाची नोंद राज्य पशुवैद्यक परिषदेच्या नोंदवहीत करण्यात आल्यानंतर, राज्य पशुवैद्यक परिषदेचा प्रबंधक विहित नमुन्यातील नोंदणी प्रमाणपत्र देईल.

**नवीकरण फी.** ४८. (१) राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे निदेश देऊ शकेल की, राज्य पशुवैद्यक नोंदवहीमध्ये नाव रहावे म्हणून दर पाच वर्षांनी राज्य पशुवैद्यक परिषदेला पंधरा रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी, विहित करण्यात येईल ती नवीकरण फी देण्यात येईल, आणि असे निदेश देण्यात आले असतील त्या बाबतीत, अशी देय फी ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या १ एप्रिल पूर्वी देण्यात आली पाहिजे.

(२) नवीकरण फी उक्त कालावधीमध्ये भरण्यात आली नाही तर, राज्य पशुवैद्यक परिषदेचा प्रबंधक, कसूर करणाऱ्या व्यक्तीचे नाव राज्य पशुवैद्यक नोंदवहीमधून काढून टाकील:

परंतु, नवीकरण फी विहित करण्यात येईल अशा रीतीने भरण्यात आल्यानंतर अशा प्रकारे काढून टाकण्यात आलेले नाव उक्त नोंदवहीत पुन्हा ठेवण्यात येईल.

(३) नवीकरण फी भरण्यात आल्यानंतर राज्य पशुवैद्यक परिषदेचा प्रबंधक नवीकरण प्रमाणपत्र देईल आणि असे प्रमाणपत्र हा, नोंदणीच्या नवीकरणाचा पुरावा असेल.

४९. (१) या कलमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, राज्य पशुवैद्यक परिषद, कोणत्याही व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देऊन आणि— **नोंदवहीतून नाव काढून टाकणे.**

(क) तिचे नाव चुकीने किंवा विपर्यस्त माहितीच्या आधारे किंवा महत्त्वाची वस्तुस्थिती दडवून ठेवून राज्य पशुवैद्यक नोंदवहीत नोंदण्यात आले आहे ; किंवा

(ख) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या आणि कारावासाची शिक्षा होण्याजोग्या अपराधासाठी ती सिद्धदोष ठरली आहे किंवा कोणत्याही व्यवसायाच्या संबंधातील अतिनिंद्य वर्तणूकीसाठी दोषी आहे किंवा तिने व्यावसायिक-वर्तणूक व शिष्टाचार यांच्या मानकांचे आणि वर्तणूक संहितेचे उल्लंघन केले आहे आणि राज्य पशुवैद्यक परिषदेच्या दृष्टिकोनातून उक्त नोंदवहीत तिचे नाव ठेवण्यास अयोग्य ठरविले आहे,

हे, निश्चित करण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी, कोणतीही असल्यास, केल्यानंतर त्याची खात्री झाली तर, कोणत्याही व्यक्तीचे नाव राज्य पशुवैद्यक नोंदवहीतून काढून टाकण्याचे आदेश देऊ शकेल.

(२) पोटकलम (१) खालील आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, राज्य पशुवैद्यक नोंदवहीतून जिचे नाव काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले असतील अशी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये नोंदणी केली जाण्यास एकतर कायमची किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वर्षांच्या कालावधीसाठी, अपात्र ठरेल.

(३) पोटकलम (१) खालील आदेश, त्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी ज्या दिनांकास समाप्त होईल त्या दिनांकापर्यंत किंवा अशा आदेशावर अपील करण्यात आले असेल तर, असे अपील अंतिमरीत्या निकालात काढले जाण्याचा दिनांक यांपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापूर्वी अमलात येणार नाही.

(४) पोटकलम (१) खालील आदेशामुळे पीडित व्यक्ती, तिला असा आदेश कळविण्यात आल्यापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत परिषदेकडे अपील करू शकेल.

(५) पोटकलम (४) खालील परिषदेच्या निर्णयामुळे पीडित झालेली व्यक्ती, तिला असा निर्णय कळविण्यात आल्यापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत केंद्र सरकारकडे अपील करू शकेल.

(६) या कलमान्वये किंवा कलम ४८ च्या पोटकलम (२) अन्वये नोंदवहीतून जिचे नाव काढून टाकण्यात आले असेल अशी व्यक्ती आपले नोंदणी प्रमाणपत्र आणि नवीकरण प्रमाणपत्र, कोणतेही असल्यास, राज्य पशुवैद्यक परिषदेच्या प्रबंधकाकडे तात्काळ परत करील आणि अशाप्रकारे काढून टाकण्यात आलेले नाव शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येईल.

(७) या कलमाच्या किंवा कलम ४८ च्या पोटकलम (२) अन्वये जिचे नाव राज्य पशुवैद्यक नोंदवहीतून काढून टाकण्यात आले असेल ती व्यक्ती, ज्या राज्य पशुवैद्यक परिषदेच्या नोंदवहीतून तिचे नाव काढून टाकण्यात आले असेल तिच्या मान्यतेशिवाय त्या राज्य पशुवैद्यक नोंदवहीत किंवा इतर कोणत्याही राज्य पशुवैद्यक नोंदवहीत तिचे नाव नोंदवून घेण्यास हक्कदार असणार नाही.

५०. राज्य पशुवैद्यक परिषदेला, कोणत्याही वेळी, तिला समाधानकारक वाटतील अशा कारणांसाठी आणि परिषदेच्या मान्यतेच्या अधीनतेने, असा आदेश देता येईल की, पंचवीस रुपयांपेक्षा अधिक नाही अशी विहित फी भरल्यानंतर, राज्य पशुवैद्यक नोंदवहीतून काढून टाकलेल्या व्यक्तीचे नाव पुन्हा पूर्ववत नोंदवता येईल. **राज्य पशुवैद्यक नोंदवहीत पूर्ववत करणे.**

५१. प्रतिवर्षी १ एप्रिल नंतर होईल तितक्या लवकर, राज्य पशुवैद्यक परिषद, राज्य पशुवैद्यक नोंदवहीच्या त्या दिनांकाला असलेल्या स्वरूपातील प्रतींचे मुद्रण करण्याची व्यवस्था करील आणि अशा प्रती त्यांची मागणी करणाऱ्या व्यक्तींना दहा रुपयांपेक्षा अधिक नाही असा विहित आकार भरल्यावर उपलब्ध करून देण्यात येतील आणि त्या उक्त दिनांकाला ज्यांची नावे तीमध्ये नोंदवण्यात आली असतील त्या व्यक्ती नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायी होत्या याबाबतचा पुरावा ठरतील. **राज्य पशुवैद्यक नोंदवहीचे मुद्रण.**

## प्रकरण आठ

### संकीर्ण

५२. एका राज्यातील नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायी दुसऱ्या राज्यात पशुवैद्यक व्यवसाय करीत असेल तर, ती व्यक्ती अशा अन्य राज्यातील नवीकरण फी पेक्षा अधिक नसेल अशी विहित फी भरल्यानंतर, ज्या राज्याच्या राज्य पशुवैद्यक नोंदवहीत तिचे नाव नोंदण्यात आले असेल तेथून ते तो ज्या राज्यात पशुवैद्यक व्यवसाय करतो त्या राज्याच्या नोंदवहीत स्थानांतरित करण्यासाठी परिषदेकडे विहित नमुन्यात अर्ज करील आणि असा अर्ज मिळाल्यानंतर, या अधिनियमात अन्यत्र काहीही अंतर्भूत असले तरी, परिषद असा निदेश देईल की, अशा व्यक्तीचे नाव प्रथम नमूद करण्यात आलेल्या राज्य पशुवैद्यक नोंदवहीतून काढावे आणि ते दुसऱ्यांदा नमूद करण्यात आलेल्या राज्याच्या राज्य पशुवैद्यक नोंदवहीत नोंदण्यात यावे आणि संबंधित राज्य पशुवैद्यक परिषद अशा निदेशाचे पालन करील. **नोंदणीचे स्थानांतरण.**

परंतु, अशा व्यक्तीला, आधीच्या राज्यातील नोंदणीच्या संबंधातील सर्व देय रकमांचे प्रदान केले आहे अशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करण्यास फर्माविण्यात येईल :

परंतु आणखी असे की, ज्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रलंबित आहे अशा एखाद्या पशुवैद्यक व्यवसायीने बदलीकरिता असा कोणताही अर्ज केला असेल त्याबाबतीत, किंवा इतर कोणत्याही कारणाकरिता परिषदेला असे आढळून आले की, बदलीसाठी करण्यात आलेला अर्ज सद्भावनापूर्वक केलेला नाही आणि त्यामुळे बदली करण्यात येऊ नये, तर त्याबाबतीत पशुवैद्यक व्यवसायीला याबाबतीत अभिवेदन करण्याची पुरेशी संधी दिल्यानंतर, परिषद तो अर्ज नाकारू शकेल.

**अधिकारितेस प्रतिबंध.** ५३. नोंदणी पुस्तकामध्ये एखादे नाव नोंदवण्यास किंवा नोंदणी पुस्तकामधून एखादे नाव काढून टाकण्यास नकार देणारा आदेश न्यायालयात प्रश्नास्पद ठरणार नाही.

**प्रमाणपत्रांची दुसरी प्रत देणे.** ५४. एखादे नोंदणी प्रमाणपत्र किंवा नवीकरण प्रमाणपत्र हरवले आहे किंवा नष्ट झाले आहे असे राज्य पशुवैद्यक परिषदेच्या प्रबंधकाची खात्री पटेल अशा प्रकारे दाखवून दिल्यास प्रबंधक, १० रुपयांपेक्षा जास्त नसलेले विहित शुल्क भरल्यानंतर प्रमाणपत्राची विहित नमुन्यामधील दुसरी प्रत देईल.

**नाव नोंदणी झाल्याचे खोटेच सांगितल्यास होणारी शास्ती.** ५५. जर एखादी व्यक्ती, आपले नाव त्यावेळी नोंदणी पुस्तकामध्ये नोंदले गेलेले नसताना ते तसे नोंदले गेले असल्याचे खोटे सांगत असेल किंवा आपल्या नावाच्या किंवा नामाभिधानाच्या संबंधात ते तसे नोंदले असल्याचे सूचित करणारा एखादा शब्दसमूह किंवा अक्षरे मुद्दाम वापरत असेल तेव्हा, ती व्यक्ती पहिल्या दोषसिद्धीबद्दल ५०० रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि त्यानंतरच्या दोषसिद्धीसाठी सहा महिन्यांपर्यंतच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रुपयांपेक्षा अधिक नाही इतक्या रकमेच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस अथवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

**नामाभिधानाचा गैरवापर.** ५६. जर एखादी व्यक्ती,—

(क) नोंदणी पुस्तकात जिच्या नावाची नोंद करण्यात आलेली नाही अशी व्यक्ती पशुवैद्यक व्यवसायीचे नामाभिधान स्वीकारत असेल किंवा त्याचा वापर करीत असेल ; किंवा

(ख) मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता धारण करीत नसताना तसे दर्शविणारी किंवा ध्वनित करणारी पदवी किंवा पदविका किंवा परवाना किंवा संक्षेपाक्षरे यांचा वापर करीत असेल,

तर अशी व्यक्ती तिच्या पहिल्या दोषसिद्धीबद्दल १००० रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि त्यानंतरच्या दोषसिद्धीसाठी सहा महिन्यांपर्यंतच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा ५००० रुपयांपेक्षा अधिक नाही इतक्या रकमेच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

**नोंदणी न झालेल्या व्यक्तींनी व्यवसाय करणे.** ५७. (१) कलम ४५, पोटकलम (२) अन्वये नियत केलेल्या दिनांकापासून एक वर्षाची मुदत संपल्यानंतर, नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायीखेरीज अन्य कोणतीही व्यक्ती, किंवा कलम ३०, खंड (ख) च्या परंतुकान्वये शासनाने परवानगी दिलेल्या व्यक्तीखेरीज इतर कोणतीही व्यक्ती, पशुवैद्यक व्यवसाय किंवा, यथास्थिति, दुय्यम पशुवैद्यक सेवा त्या राज्यात करू शकणार नाही.

(२) जर एखादी व्यक्ती पोटकलम (१) च्या तरतुदीचे व्यतिक्रमण करील तर ती व्यक्ती, तिच्या पहिल्या दोषसिद्धीबद्दल १००० रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि त्यानंतरच्या दोषसिद्धीसाठी सहा महिन्यांपर्यंतच्या कारावासाच्या शिक्षेस, किंवा ५००० रुपयांपेक्षा अधिक नाही इतक्या रकमेच्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

**नोंदणी प्रमाणपत्र स्वाधीन करण्यात कसूर करणे.** ५८. नोंदवहीमधून ज्या व्यक्तीचे नाव काढून टाकण्यात आलेले आहे अशी एखादी व्यक्ती जर पुरेसे कारण न देता आपले नोंदणी प्रमाणपत्र किंवा नवीकरण प्रमाणपत्र, किंवा दोन्ही स्वाधीन करण्यास कसूर करील तर, ती व्यक्ती ५०० रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि अपराध पुढेही घडत राहिल्यास अशा सतत घडलेल्या अपराधाच्या पहिल्या दिवसानंतर, प्रत्येक दिवसाला १० रुपये इतक्या मर्यादेपर्यंतच्या अतिरिक्त द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**अपराधाची दखल घेणे.** ५९. राज्य शासनाच्या आदेशाद्वारे किंवा राज्य पशुवैद्यक परिषदेने केलेल्या तक्रारीवरून असेल ते खेरीज करून, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या इतर कोणत्याही अपराधाची दखल कोणतेही न्यायालय घेणार नाही.

**दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करण्यास रोध.** ६०. या अधिनियमाला किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांना, विनियमांना किंवा आदेशांना अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करावयाचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत, केंद्र सरकारविरुद्ध किंवा राज्य शासनाविरुद्ध किंवा परिषदेविरुद्ध किंवा राज्य पशुवैद्यक परिषदेविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

**फीचा भाग परिषदेला प्रदान करणे.** ६१. राज्य पशुवैद्यक परिषद प्रत्येक वर्षाच्या जून अखेरपूर्वी त्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी संपणाऱ्या बारा महिन्यांच्या कालावधीमध्ये या अधिनियमान्वये राज्य पशुवैद्यक परिषदेने वसूल केलेल्या एकूण फीच्या एक चतुर्थांशाइतकी रक्कम परिषदेला प्रदान करील.

६२. (१) परिषद, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी सल्लामसलत करून केंद्र सरकार देईल अशा सर्वसाधारण निदेशांनुसार व विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात समुचित लेखे व इतर संबद्ध अभिलेख ठेवील व ताळेबंदासहित वार्षिक लेखा विवरणपत्र तयार करील. **लेखे व लेखापरीक्षा.**

(२) परिषदेच्या लेख्यांची भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून किंवा याबाबतीत त्यांनी नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून दरवर्षी लेखापरीक्षा करण्यात येईल व अशा लेखापरीक्षेच्या संबंधात त्याने किंवा अशा तऱ्हेने नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीने केलेला खर्च, परिषदेकडून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना देय ठरेल.

(३) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना आणि परिषदेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याच्या संबंधात त्यांच्याकडून नेमण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना शासकीय लेख्यांच्या लेखापरीक्षेच्या संबंधात जे अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतील आणि विशेषत: लेखापुस्तके, संबंधित प्रमाणके व इतर कागदपत्रे सादर करण्यास सांगण्याचा आणि परिषदेच्या कार्यालयाची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(४) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी प्रमाणित केलेले किंवा यासंबंधात त्यांनी नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीने प्रमाणित केलेले परिषदेचे लेखे त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह केंद्र सरकारकडे पाठवण्यात येतील व ते शासन संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ते मांडण्याची व्यवस्था करील.

(५) अशा तऱ्हेने प्रमाणित केलेल्या, परिषदेच्या लेख्यांची एक प्रत त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह त्याचवेळी परिषदेला पाठवण्यात येईल.

६३. (१) या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे परिषद अनुपालन करीत नाही असे केंद्र सरकारला दिसून येईल तेव्हा केंद्र सरकार तीन व्यक्तींचा समावेश असलेला चौकशी आयोग नेमू शकेल. या आयोगाच्या तीन व्यक्तींपैकी दोन व्यक्ती केंद्र सरकारकडून नियुक्त करण्यात येतील व त्यातील एक उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असेल आणि एक व्यक्ती परिषदेकडून नियुक्त करण्यात येईल व केंद्र सरकार या आयोगाकडे ज्या बाबीच्या संबंधात चौकशी करावयाची असेल ती बाब निर्देशित करील. **चौकशी आयोगाची नेमणूक.**

(२) आयोग, संक्षिप्त रीतीने चौकशी करील आणि आपल्याकडे विचारार्थ पाठवलेल्या बाबींचा अहवाल आयोगाला कोणत्याही उपाययोजनांबद्दल शिफारशी करावयाच्या असल्यास त्या उपाययोजनांसह केंद्र सरकारला देईल.

(३) केंद्र सरकार, अहवाल स्वीकृत करू शकेल किंवा तो फेरबदल करण्यासाठी किंवा फेरविचारासाठी आयोगाकडे पाठवू शकेल.

(४) अहवाल अंतिमत: स्वीकारण्यात आल्यानंतर, केंद्र सरकार, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत, अशा प्रकारे शिफारस केलेल्या उपाययोजना स्वीकारण्याचा आदेश परिषदेला देऊ शकेल आणि परिषद अशाप्रकारे विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत आदेशाचे पालन करण्यात कसूर करील तर, केंद्र सरकार, आयोगाच्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी आवश्यक असेल असा आदेश पारित करू शकेल किंवा अशी कार्यवाही करू शकेल.

(५) राज्य पशुवैद्यक परिषद या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे पालन करीत नाही असे राज्य शासनास आढळून येईल त्या त्या वेळी राज्य शासन, राज्य पशुवैद्यक परिषदेच्या संबंधात चौकशी करण्यासाठी पोटकलम (३) व (४) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असा आदेश पारित करू शकेल व कार्यवाही करू शकेल.

६४. (१) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्रकरणे दोन, तीन, चार व पाच यांची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल. **नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

(२) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

६५. (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, प्रकरणे सहा, सात आणि आठची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल. **नियम करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.**

(२) विशेषत: आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतुदी करता येतील, त्या बाबी अशा :—

(क) कलम ३६ अन्वये राज्य पशुवैद्यक परिषदेचा अध्यक्ष ज्या रीतीने निवडला जाईल ती रीत;

(ख) प्रकरण ६ खाली निवडणूक ज्या रीतीने घेण्यात येईल ती रीत ;

(ग) कलम ३८ च्या पोटकलम (६) अन्वये राज्य पशुवैद्यक परिषदेने आपल्या बठकांमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(घ) कलम ४० अन्वये कार्यकारी समिती व इतर समित्या घटित करण्यासंबंधातील शर्ती व निर्बंध ;

(ङ) कलम ४१ अन्वये राज्य पशुवैद्यक परिषदेच्या आणि समित्यांच्या बैठकांना उपस्थित राहण्यासाठी द्यावयाची फी व भत्ते ;

(च) कलम ४२ च्या पोटकलम (२) अन्वये राज्य पशुवैद्यक परिषदेचा प्रबंधक, इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती ;

(छ) कलम ४४ च्या पोटकलम (४) खंड (ङ) अन्वये राज्य पशुवैद्यक नोंदवहीत समाविष्ट करावयाचा तपशील ;

(ज) कलम ४५ चे पोटकलम (२) आणि कलम ४७ चे पोटकलम (१) अन्वये नोंदणी अर्जासोबत भरावयाची फी ;

(झ) कलम ४५ चे पोटकलम (५) आणि कलम ४७ चे पोटकलम (५) अन्वये नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना ;

(ञ) कलम ४६, कलम ५०, कलम ५२ आणि कलम ५४ अन्वये देय असणारी फी ;

(ट) कलम ४८ च्या पोटकलम (१) अन्वये नवीकरणासाठीची फी ;

(ठ) कलम ४८ च्या पोटकलम (२) च्या परंतुकाअन्वये नवीकरणाची फी ज्या रीतीने द्यावयाची ती रीत ;

(ड) कलम ५१ अन्वये राज्य पशुवैद्यक परिषदेच्या नोंदवहीच्या छापील प्रती पुरवण्याचा आकार ;

(ढ) कलम ५४ अन्वये प्रमाणपत्राच्या दुसऱ्या प्रतीचा नमुना ;

(ण) प्रकरण सहा, सात आणि आठ अन्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या नियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळ दोन सभागृहांचे मिळून बनलेले असेल त्याबाबतीत त्याच्या प्रत्येक सभागृहासमोर किंवा, असे विधानमंडळ एका सभागृहाचे असेल त्याबाबतीत त्या सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**विनियम करण्याचा अधिकार.** ६६. (१) परिषद, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, या अधिनियमाच्या आणि कलम ६४ खाली करण्यात येतील अशा नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे, प्रकरणे दोन, तीन, चार आणि पाच यांची प्रयोजने पार पाडण्यासाठी विनियम करू शकेल.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या व्यापकतेला बाध न येता, अशा विनियमांमध्ये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल, त्या बाबी अशा :—

(क) कलम ३, पोटकलम (४) अन्वये अध्यक्ष व उपाध्यक्ष ज्या रीतीने निवडला जाईल ती रीत ;

(ख) कलम ९, पोटकलम (६) आणि कलम १२, पोटकलम (२) अन्वये अनुक्रमे परिषदेने व समितीने त्यांच्या बैठकीमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ग) कलम ११, पोटकलम (२) अन्वये परिषदेचा सचिव, इतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती ;

(घ) कलम १३, अन्वये परिषदेच्या व समित्यांच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी द्यावयाची फी व भत्ते ;

(ङ) कलम २३, पोटकलम (१) अन्वये भारतीय पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही ज्या नमुन्यात व ज्या रीतीने ठेवावयाची तो नमुना व ती रीत ;

(च) कलम २३, पोटकलम (२) अन्वये भारतीय पशुवैद्यक व्यवसायींची नोंदवही ठेवण्याची रीत ;

(छ) कलम २४ अन्वये ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अर्ज करता येईल ती रीत ;

(ज) कलम २५, पोटकलम (१) अन्वये अर्जाचा नमुना व द्यावयाची फी ;

(झ) कलम २५, पोटकलम (२) अन्वये नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना;

(ञ) कलम २५, पोटकलम (३) अन्वये देय असलेली फी ;

(ट) कलम २५, पोटकलम (३) अन्वये प्रमाणपत्राच्या दुसऱ्या प्रतीचा नमुना ;

(ठ) कलम २६, पोटकलम (१) अन्वये ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अर्ज करता येईल ती रीत व देय असलेली फी ;

(ड) कलम ३१, पोटकलम (१) अन्वये पशुवैद्यक व्यावसायिकांनी पाळावयाची व्यावसायिक वर्तनाची मानके आणि शिष्टाचार आणि नीतिशास्त्रीय संहिता ;

(ढ) या अधिनियमाखाली विनियमाद्वारे तरतूद करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) परिषदेने, केलेला प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारकडे पाठवण्यात येईल आणि ते शासन असे विनियम होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर त्या विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर ते विनियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होतील किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**निरसन व व्यावृत्ती.**

**६७.** कोणत्याही राज्यात, या अधिनियमाच्या प्रारंभापासून, या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबींशी संबंधित आणि त्या राज्यात अंमलात असलेला इतर प्रत्येक अधिनियम, तो अधिनियम, किंवा त्यात अंतर्भूत असलेली कोणतीही तरतूद या अधिनियमाशी अनुकूल किंवा प्रतिकूल असेल त्या मर्यादेपर्यंत निरसित होईल आणि सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याच्या कलम ६ च्या तरतुदी इतर अधिनियम हे जणू काही केंद्रीय अधिनियम असल्याप्रमाणे अशा निरसनास लागू होतील.

## पहिली अनुसूची

[कलम २ (ङ) व कलम १५ पहा.]

भारतातील विद्यापीठे किंवा पशुवैद्यक संस्था यांनी मान्यता दिलेल्या मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता

| विद्यापीठ किंवा पशुवैद्यक संस्था (१) | मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता (२) | नोंदणीचा संक्षेप (३) |
|---|---|---|
| **पदवी** | | |
| १. आग्रा विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| २. आंध्रप्रदेश कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक<br>पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी.<br>बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| ३. आसाम कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| ४. विधान चंद्र कृषि विश्व विद्यालय | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| ५. बिहार विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| ६. मुंबई विद्यापीठ | विज्ञान स्नातक (पशुवैद्यक)<br>पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक<br>पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी. एससी. (पशुवैद्यक)<br>बी. व्ही. एससी. व ए. एच.<br>बी. व्ही. एससी. |
| ७. कलकत्ता विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक<br>पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी.<br>बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| ८. कालिकत विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी. व्ही. एससी. |
| ९. चंद्रशेखर आझाद कृषि व तंत्रशास्त्र विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| १०. गौहाटी विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| ११. गोविंद वल्लभ पंत कृषि व तंत्रशास्त्र विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| १२. गुजराथ कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| १३. हरियाणा कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक<br>पशुवैद्यक प्राणी शास्त्र | बी. व्ही. एससी. व ए. एच.<br>बी. व्ही. एससी. |
| १४. जबलपूर विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक<br>पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी.<br>बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| १५. जवाहरलाल नेहरू कृषि विश्व विद्यालय | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| १६. केरळ कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक<br>पशुवद्यकशास्त्र स्नातक | बी. व्ही. एस. सी. व ए. एच.<br>बी. व्ही. एससी. |
| १७. केरळ विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी. व्ही. एससी. |
| १८. कोकण कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| १९. मद्रास विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी. व्ही. एससी. |
| २०. मगध विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| २१. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| २२. महात्मा फुले कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक<br>पशुवद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी.<br>बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| २३. मराठवाडा कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| २४. म्हैसूर विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी. व्ही. एससी. |
| २५. नागपूर विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक<br>पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक<br>विज्ञान स्नातक (पशुवैद्यक) | बी. व्ही. एससी.<br>बी. व्ही. एससी. व ए. एच.<br>बी. एससी. (पशुवैद्यक) |
| २६. ओरिसा कृषि व तंत्रशास्त्र विद्यापीठ. | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. |
| २७. उस्मानिया विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक<br>पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी.<br>बी. व्ही. एससी. व ए. एच. |

अनुसूची—चालू

| (१) | | (२) | (३) |
|---|---|---|---|
| २८. | पंजाब विद्यापीठ, लाहोर (१९४२-ऑगस्ट १९४७) | पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी.व्ही.एससी. |
| २९. | पूर्व पंजाब विद्यापीठ, सोलन (१९४८-५४) | पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी.व्ही.एससी. |
| ३०. | पंजाब विद्यापीठ, चंदीगढ (१९५४-६२) | पशुवैद्यकशास्त्र स्नातक<br>पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक. | बी.व्ही.एससी.<br>बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ३१. | पंजाब कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ३२. | पंजाबराव कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ३३. | राजस्थान कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ३४. | राजस्थान विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ३५. | राजेंद्र कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ३६. | रांची विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ३७. | सरदार पटेल विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ३८. | सौगर विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी.व्ही.एससी. |
| ३९. | श्री. वेंकटेश्वर विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी.व्ही.एससी. |
| ४०. | तामिळनाडू कृषि विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी.व्ही.एससी. |
| ४१. | उदयपूर विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ४२. | कृषि शास्त्र विद्यापीठ, हेब्बल | पशुवैद्यकशास्त्र स्नातक | बी.व्ही.एससी. |
| ४३. | उत्तर प्रदेश कृषि विद्यापीठ, पंतनगर. | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ४४. | उत्कल विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ४५. | विक्रम विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ४६. | मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| [1][४७. | कृषि शास्त्र व तंत्रविज्ञान विद्यापीठ, श्रीनगर, जम्मू व काश्मीर. | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी. व ए.एच. |
| ४८. | हिमाचल प्रदेश कृषि विश्व विद्यालय, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, पालमपूर (हि.प्र.) | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी.व्ही.एससी व ए.एच. |

उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी १२ जानेवारी, १९९० रोजी व तेव्हापासून उपरोक्त अर्हता अधिकृत पशुवैद्यक अर्हता समजली जाईल.]

| | | | |
|---|---|---|---|
| [2][४९. | बिरसा कृषि विद्यापीठ, कानके, रांची (बिहार) | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. पूर्वोक्तानुसार, फक्त ८ जानेवारी, १९९४ रोजी व तेव्हापासून उपरोक्त अर्हता अधिकृत पशुवैद्यक अर्हता समजली जाईल. |
| ५०. | चौधरी चरणसिंग, हरियाणा कृषि विद्यापीठ, हिसार (हरियाणा) | पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन स्नातक | बी. व्ही. एससी. व ए. एच. पूर्वोक्तानुसार, फक्त ८ ऑक्टोबर, १९९१ रोजी व तेव्हापासून उपरोक्त अर्हता अधिकृत पशुवैद्यक अर्हता समजली जाईल.] |

१. स्थायी आदेश ८२३, दिनांक २० एप्रिल, १९९३ द्वारे समाविष्ट केले.

२. स्थायी आदेश ११६५, दिनांक ४ एप्रिल, १९९५ द्वारे समाविष्ट केले.

अनुसूची—समाप्त

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **पदविका** | | |
| १. आसाम पशुवैद्यक महाविद्यालय | पशुवैद्यक शास्त्रातील स्नातक<br>पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन मधील स्नातक. | जी. व्ही. एससी.<br>जी. व्ही. एससी. व ए.एच. |
| २. बंगाल पशुवैद्यक महाविद्यालय | बंगाल पशुवैद्यक महाविद्यालयाचा स्नातक<br>पशुवैद्यक शास्त्रातील स्नातक. | जी. बी. व्ही. सी.<br>जी. व्ही. एससी. |
| ३. बिहार पशुवैद्यक महाविद्यालय | बिहार पशुवैद्यक महाविद्यालयाचा स्नातक | जी. बी. व्ही. सी. |
| ४. मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय | मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयाचा स्नातक | जी. बी. व्ही. सी. |
| ५. मद्रास पशुवैद्यक महाविद्यालय | मद्रास पशुवैद्यक महाविद्यालयाचा स्नातक | जी. एम. व्ही. सी. |
| ६. पंजाब पशुवैद्यक महाविद्यालय | अनुज्ञप्ती (लायसन) मिळालेला पशुवैद्यक व्यवसायी. (१५ ऑगस्ट, १९४७ पूर्वी प्रदान केलेला.) | एल. व्ही. पी. |

## दुसरी अनुसूची

[कलम २ (ड.) व कलम १६ पहा]

### भारताबाहेरील संस्थांनी मान्यता दिलेल्या मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता

| देश व संस्था (१) | मान्यताप्राप्त पशुवैद्यक अर्हता (२) | नोंदणीचा संक्षेप (३) |
|---|---|---|
| **युनायटेड किंगडम** | | |
| १. रॉयल कॉलेज ऑफ व्हेटर्नरी सर्जन्स्. | रॉयल कॉलेज ऑफ व्हेटनरी सर्जन्सचे सदस्य | एम.आर.सी. व्ही.एस. |
| २. ब्रिस्टॉल विद्यापीठ .. | पशुवैद्यकशास्त्र स्नातक .. | बी.व्ही.एससी. |
| ३. केम्ब्रिज विद्यापीठ .. | पशुवैद्यकशास्त्र स्नातक .. | बी.व्ही.एससी. |
| ४. एडिनबर्ग विद्यापीठ .. | पशुवैद्यकशास्त्र स्नातक .. | बी.व्ही.एससी. |
| ५. ग्लॅस्गो विद्यापीठ .. | पशुवैद्यकशास्त्र स्नातक .. | बी.व्ही.एससी. |
| ६. लिव्हरपूल विद्यापीठ .. | पशुवैद्यकशास्त्र स्नातक .. | बी.व्ही.एससी. |
| ७. लंडन विद्यापीठ .. | पशुवैद्यक औषधशास्त्र स्नातक .. | बी.व्हेट. मेड. |
| **आयरलँड प्रजासत्ताक** | | |
| ८. डब्लीन विद्यापीठ .. | पशुऔषधवैद्यक स्नातक .. | बी.व्ही.एम. |
| ९. आयरलँड राष्ट्रीय विद्यापीठ | पशुऔषधवैद्यक स्नातक .. | बी.व्ही.एम. |